# PERSIAN SOURCES OF INDIAN HISTORY

VOL. 3

KHARE

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ५१

# ऐतिहासिक फारसी साहित्य

## तृतीय खंड



# Persian Sources of Indian History

## Vol. III

*By*

**Ganesh Hari Khare**

*Curator, B. I. S. Mandala*

---

संपादक—गणेश हरि खरे

क्यूरेटर भा. इ. सं. मंडळ

---

श. १८६१ ] किंमत ३॥ रु. [ A. D. 1939

# भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला

* अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारानें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयासाठीं मंजूर केले आहेत. ‡ हें पुस्तक शैक्षणिक (training) संस्था व शिक्षकग्रंथालयें यांसाठीं मंजूर झालें आहे. त्रैमासिकाच्या फुटकळ अंकास रु. १ व ट. ह. पडेल.

| अनुक्रम | किंमत रु. |
|---|---|
| १ अहवाल ( शके १८३२ ) | ३ |
| २ „ ( शके १८३३ ) | ५ |
| ३ सुबंत विचार(कै.वि.का.राजवाडे) | १० |
| ४ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३४ ) | ५ |
| ५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (कै.वि.का.राजवाडे) | १॰८ |
| *६ प्रथम संमेलन वृत्त (शके १८३५) | ॰१२ |
| *७ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३५ ) | ६ |
| *८ द्वितीय संमेलन वृत्त (शके १८३६) | ३ |
| *९ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३६ ) | ३ |
| *१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० ( शिवकालीन घराणीं ) | ३ |
| *११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७) | ६ |
| *१२ तृतीय संमेलन वृत्त (शके १८३७) | ३ |
| *१३ मुकुंद–महाभाष्य ( संस्कृत ) | ॰८ |
| *१४ ग्रंथराज ( दासोपंत ) | ॰८ |
| *१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला | ॰१२ |
| *१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा | ॰१२ |
| *मंडळ–त्रैमासिक प्रत्येक पुस्तक | ३ |
| *१७ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३८ ) | ३ |
| १८ चतुर्थ-संमेलन-वृत्त (शके १८३८) | ३ |
| *१९ राजवाडे-खंड-स्थलसूची | ४ |
| *२० पंचम संमेलन-वृत्त (शके १८३९) | ३ |
| २१ संशोधनसंग्रह (१८३९) छापत आहे. | |
| २२ चंद्रचूड–दप्तर–कला १ | ३ |
| २३ महाराष्ट्र–सारस्वत (संपलें) | १० |
| २४ षष्ठ संमेलन-वृत्त ( १८४० ) | ४ |
| २५ सप्तम संमेलन वृत्त ( १८४१ ) | ३ |
| २६ संशोधकाची छोटी जंत्री | ॰४ |
| २७ प्रदर्शन परिचय | ॰४ |

| अनुक्रम | किंमत रु. |
|---|---|
| *२८ फारसी पत्रव्यवहार | ५ |
| २९ फार्सी–मराठी कोश | ४ |
| ३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला | १॰८ |
| ३१ Historical Miscellany | १ |
| ३२ पुरंदरे-दप्तर भाग १ | ४ |
| ३३ शिवचरित्रसाहित्य खं. २ रा | ४ |
| ३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ला | २ |
| ३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खं. १, | २ |
| ३६ राजाराम–चरितम् | १॰८ |
| ३७ मंडळांतील नाणीं | १ |
| †३८ शिवचरित्रसाहित्य खंड ४ | १॰८ |
| ३९ गोवळकोंड्याची कुत्बशाही | रु. ४ |
| †४० ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ला. | १॰८ |
| †४१ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड २ रा. | २ |
| †४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड २ रा. | १॰८ |
| ४३ मंडळ चित्र ग्रंथ चित्रें २० | ॰८ |
| ४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह खं. ३ | २॥ |
| ‡४५ विजयनगर स्मारकग्रंथ | ४ |
| †४६ ऐतिहासिक फारसी साहित्य खंड २ | १॰८ |
| ४७ शिवचरित्रसाहित्य खं. ६ | १॰८ |
| †४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार | ॰१२ |
| ४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह कानडी विभाग | १ |
| ५० शिवचरित्रसाहित्य खंड ७ | १॰८ |
| †५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३ | १॰८ |
| ५२ शिवचरित्रवृत्तसंग्रह २रा खंड : फार्सी विभाग | १॰४ |

टीप–ट. ह. व बंगी, व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. † हा ग्रंथ त्रैमासिकांत भागशः प्रसिद्ध झाला आहे. ४०, ४१, ४२, ४६, ४८, ५१ स्वतंत्रहि मिळतात.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ५१

# ऐतिहासिक फारसी साहित्य

## तृतीय खंड



# Persian Sources of Indian History

## Vol. III

*By*

**Ganesh Hari Khare**

*Curator, B. I. S. Mandala*



संपादक—गणेश हरि खरे

क्यूरेटर भा. इ. सं. मंडळ

श. १८६१ ] किंमत १॥ रु. [ A. D. 1939

# शोध

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५ | १७ | इ. १६५९ | इ. १६४९ |
| ३९ | ६ | शव्वाल | शाबान |
| ४२ | २ | इ. १६५८ | इ. १७०७ |
| ५१ | टीप ओ. ३ | एक फार्सी अनोळखी | رجوع...ممالک |
| ५७ | टीप ओ. २ | ४१ | ४५ |
| ५८ | ,, | ४६ | ४५ |
| ६० | ,, | ४६ | ४५ |
| ६१ | ,, | व इतर | व 'चार मश्रीक' सेरीज इतर |
| ६३ | ,, | ४६ | ४५ |
| ६४ | टीप ओ.२ व ६ | ४६ | ४५ |
| ६६ | २१ | १०२१ व १०२९ | १०२९ व १०२१ |
| ७१ | ५ | इ. १५२६ | इ. १६२६ |
| ८१ | १९ | १९व्या ओळीपुढें '[समासांत*] ... ... پروانگر خلاصخان وزیر حکومت' असा मजकूर घालणें | |

पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ येथें आर्यभूषण छापखान्यांत रा. रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें आणि प्रो. द.वा. पोतदार आणि श्री. सर. गं. ना. मुजुमदार यांनीं ३१२।३ सदाशिव पेठ पुणें २ येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना

१

ऐतिहासिक फार्सी साहित्याचा हा तिसरा खंड आज पुरा होत आहे. याचीं पानें मंडळ त्रैमासिकाचें वर्ष १८ अंक ३ व ४ आणि वर्ष १९ अंक १, २ व ४ यांत क्रमशः आलीं असून त्यांत तीन प्रकरणांत मिळून ९५ लेख प्रसिद्ध झाले आहेत. हे कागद अगडी, गदग, बिसरहळ्ळि, लक्ष्मेश्वर व साळशी अशा पांच देसाई घराण्यांतील असून ते मंडळातर्फे संशोधनासाठीं कर्नाटकांत हिंडत असतां पूर्वी शिवचरित्रसाहित्य खंड ६ मध्यें प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांच्या संगतीनेंच मला मिळाले होते. पण हे भागशः प्रसिद्ध करावयाचें ठरल्यामुळें त्याचें पुस्तक संपण्यास एवढा विलंब लागला. उपर्युक्त देसायांनीं आपले अस्सल कागदपत्र संपादनासाठीं आजपर्यंत मंडळांत ठेवले याबद्दल मंडळातर्फे मी त्यांचा फार आभारी आहे.

हे कागद मंडळांत आल्यानंतर नकलण्याचें काम मंडळाचे मुनशी व मी अशा दोघांनीं केलें असून पुढील सर्व काम मुख्यतः मींच उरकलें आहे. हे कागद छापतांना सामान्य धोरण दुसऱ्या खंडाचेंच ठेविलें आहे. त्याप्रमाणें खुलाशाच्या टीपा ज्या त्या पत्राखालीं यावयास पाहिजे होत्या. पण मूळ कागदांचें यथातथ्य रूप समजण्यासाठीं आवश्यक अशा टीपाच पुष्कळ झाल्या व त्या ज्या त्या पत्राखालीं देणें अपरिहार्य होतें. यामुळें खुलाशाच्या टीपा शेवटीं दिल्या आहेत. पत्रांचा कालानुक्रम त्यांची समजूत पडण्यास फार मदत करतो, म्हणून तो शेवटीं दिला आहे. आदिलशाही फर्मानें महाराष्ट्रांत फार मिळतात. तीं उलगडण्यास त्यांवरील शिक्के व तुग्रे समजून घेणें अगदीं आवश्यक आहे. म्हणून या शिक्क्यांच्या अभ्यासाचें फलितही ग्रंथास जोडलें आहे. शेवटीं सूची दिली असून तींत अपरिचित गांवांची ओळख करून देण्याचा शिचसा खंड ६ प्रमाणें यत्न केला आहे.

अशा तऱ्हेनें सजविलेल्या या पुस्तकाचें महत्त्व संपादकास कितीही वाटलें तरी त्याची खरी किंमत अभ्यासक त्याचें स्वागत कसें करतात यावर अवलंबून आहे.

२

ह्या कागदांत आलेल्या ऐतिहासिक माहितीचा खुलासा टीपांमधून केला आहे. पण असे कित्येक मुद्दे आहेत कीं, ते टीपांत चर्चिले असते तर अधिक जागाही लागती व वारंवार पुनरुक्ति झाली असती. अशांपैकीं तिहींचा परामर्श येथें घ्यावयाचें योजिलें आहे.

कित्येक आदिलशाही फर्मानांच्या शेवटीं 'परवानगी हुजूर...' व 'बअअलाम खान...' अशीं एक किंवा दोन वाक्यें असतात. पैकीं पहिलें वाक्य फर्मान हुजूरच्या म्हणजे राजाच्या परवानगीनें निघालें असें सांगतें. प्रत्येक राजाज्ञा राजाच्या संमतीनें निघावयास पाहिजे. तेव्हां पहिला शेरा फर्मानावर असल्यास तो अनुरूपच आहे असें म्हटलें पाहिजे. पण दुसरा शेरा कशासाठीं ? त्या शेऱ्याचा अर्थ त्यांत उल्लेखिलेल्या मनुष्याच्या माहितीनें असा होतो.

आतापर्यंत आदिलशाही फर्मानें पुढील लोकांच्या माहितीनें निघाल्याचें आढळून आलें आहे. (१) किश्वरखान (सरे नौबत), (२) मिजाझखान, (३) दिलावरखान (सरसरे नौबत, अमीरे जुम्लह, नव सरसरे नौबत), (४) शाहनवाझखान (मज्लिसी हुजूर, सरे मज्लिस, वझीरे हुकूमत), (५) इख्लासखान (अमीरे जुम्लह, वझीरे हुकूमत), (६) दियानतुल्मुलूक (अमीरे जुम्लह, सरे मज्लिस), (७) मुस्तफाखान, (८) दौलत खवासखान (सरखवासे हुजूर), (९) खानभाई, (१०) रेहान इख्लासखान, (११) अमीनुल्मुल्क (वझीरे हुकूमत), (१२) शाह अबुल–हसन, (१३) सय्यिद् नूरुल्लाह (सरखेले ममालिक), (१४) मसऊद्खान. पैकीं फक्त मिजाझखान व खानभाई या नांवांविषयीं शंका येते. बाकी सर्व नांवें बरोबर आहेत. यांतील पहिले सहा २ ऱ्या इब्राहीमच्या कारकिर्दींत होते. ७ ते १३ व इख्लासखान हे मुहम्मदच्या कारकिर्दींत आढळतात. २ ऱ्या अलीच्या कारकिर्दींत फक्त १३ वा सांपडतो आणि १४ वा केवळ सिकंदरच्या राजवटांत होता असें दिसतें. इख्लासखान हें नांव नव्हे पदवी आहे. इब्राहीम आदिलशाहाच्या कारकिर्दींतील इख्लासखानाचें नांव काय होतें तें समजत नाहीं. पण शेवटीं दिलेल्या शिक्क्यांवरून व शिचसा ६।३४, ४१ यांवरून रेहान, यूसुफ, मुहम्मद् व खानखानान असे आणखी चार इख्लासखान ठाऊक झाले आहेत. यांपैकीं फक्त खानखानानचा शिक्का फर्मानावर नाहीं. बाकीचे फर्मानांवरील शिक्क्यांमुळेंच ओळखूं आले आहेत.

शिक्क्यांत अथवा फर्मानांच्या समासांत उल्लेखिलेलीं उपर्युक्त मनुष्यें कोणी अधिकारी असलीं पाहिजेत हें उघड आहे. हे अधिकारी निरनिराळ्या काळीं कोणत्या अधिकारावर होते तें त्या त्या अधिकाऱ्यांच्या पुढें कंसांत दिलें आहे. सरखवासे हुजूर (खाशा नोकरांचा मुख्य), सरे नौबत (सेनानी), अमीरे जुम्लह (फडणीस), सरखेले ममालिक (घोडदळाचा मुख्य), सरे मज्लिस (सभापति) यांचे अर्थ कंसांत दर्शविल्याप्रमाणें असावे. मज्लिसी हुजूर व वझीरे हुकूमत यांचे निश्चित अर्थ कोणते हें मात्र समजत नाहीं. अर्थ कांहीं का असेनात. कित्येक फर्मानें फक्त राजाच्या परवानगीनें, तर कित्येक राजाच्या परवानगीनें व कोणा

प्रधानाच्या माहितीनें कां सुटावी याचा नीट उलगडा होत नाहीं. पण मला असें वाटतें कीं, केवळ लश्करी हालचालींचीं फर्मानें फक्त राजाच्या परवानगीनें सुटत, तर कारभार, महसूल इत्यादि प्रकरणांतील फर्मानें कोणा तरी प्रधानाच्या माहितीनें निघत. एकाच वेळीं अनेक प्रधान असल्यानें निरनिराळ्या खात्यांसंबंधीं सुटलेल्या एकाच वेळच्या फर्मानांवर भिन्न प्रधानांच्या माहितीचे शेरे आढळणें स्वाभावीक आहे व तसे ते आढळतातही.

अनेक आदिलशाही फर्मानांत सुहूर व हिजरी अशा दोन्ही कालगणनांचे उल्लेख असतात. हे कधीं एकमेकांशीं जुळते आढळतात, तर कधीं हिजरी सुहूरच्या पुढें गेलेला सांपडतो. अशा वेळीं दोन्ही गणनांचा मेळ कसा घालावयाचा हा प्रश्न पडतो. याचें उत्तर मीच मागें शिवाजी निबंधावली भाग २ पृष्ठ ८९ वर देण्याचा प्रयत्न केला आहे; पण तो उलगडा आज मला समाधानकारक वाटत नाहीं. केवळ लश्करी हालचालींच्या फर्मानांवर सुहूरचा उल्लेख प्रायः आढळत नाहीं. तेव्हां त्याचा संबंध कारभारविषयक प्रश्नांशीं असला पाहिजे. या व इतर खंडांतील अनेक फर्मानांवरून असें दिसतें कीं, विजापुरी राज्यांत सुहूर गणनेचें वर्षच राज्यकारभारांत प्रमाण मानलें जाई. अर्थात् नवीन नेमणुकी, बदल्या, इनामें व मोकासे काढणें, देणें, अदलाबदल, निरनिराळ्या वसुल्या या सर्व सुहूर वर्षावर चालत. तेव्हां अशा कोणत्याही बाबीसंबंधीं फर्मान असलें व त्यावर सुहूर सनाचा उल्लेख सांपडला तरी त्याचा फर्मानाच्या तारखेशीं कांहीं संबंध नसून त्यांत उल्लेखिलेल्या इनामादि विषयाशीं तो निगडित आहे असेंच समजलें पाहिजे. यामुळें सुहूर व हिजरी यांचा मेळ आहे कीं नाहीं हें पाहण्याची तादृश आवश्यकता नाहीं व तो नेहमीं बसेलच असेंही सांगवत नाहीं. हा मुद्दा नीट समजण्यासाठीं येथें एक महत्त्वाचें उदाहरण देतों. 'मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास' या पुस्तकांत हि. १०८१ जखर १५ या तारखेचीं ६ फर्मानें प्रसिद्ध झालीं आहेत[१]. यांत बाजी घोरपड्यानें बजाविलेल्या सेवेबद्दल त्याच्या मुलास पांच परगणे सुहूर १०६८ पासून इनाम दिले आहेत. येथें फर्मानांतील सुहूरपेक्षां हिजरी साल ३ वर्षांनीं पुढें आहे. तीं फर्मानें छापतांना सुहूरचा उल्लेख चुकला असावा अशी माझी कल्पना होती; पण आज मला तसें वाटत नाहीं. तें इनाम सुहूर १०६८ पासून बाजीच्या मुलाकडे चालू झाल्याचें धरावयाचें येवढाच त्याचा अर्थ आहे. यावरून सुहूर सन आणि त्याच्या निर्देशापूर्वीं प्रत्येक फर्मानांत از (पासून) हा शब्द आढळतो तो दोन्ही बहुतेक ठिकाणीं सहेतुक असतात असें म्हणतां येतें[२].

---

१ परिशिष्ट अ पृ. ४०–४७. २ यास कांहीं फर्मानांचे अपवाद आहेत; पण तो सुहूर सनाचा उल्लेख करण्याचे रूढीच्या अंधानुकरणाचा परिणाम असावा.

पण मग येथें हा प्रश्न उत्पन्न होतो कीं, ज्या आज्ञेचा अमल एका विशिष्ट कालापासून करावयाचा ती त्या कालानंतर कांहीं महिन्यांनीं अथवा वर्षांनीं द्यावयाची हें कितपत तर्कसिद्ध आहे ? यावर माझें उत्तर असें–अनेक फर्मानांचा सूक्ष्म अभ्यास असें दाखवितो कीं, तीं लांब मुदतीच्या भांडणाचे किंवा विनंत्यांचे निकालच असतात. तेव्हां त्यांत निकालाचे तारखेपूर्वीच्या कालाचा उल्लेख आल्यास नवल नाहीं. आजही कित्येक दाव्यांचे निकाल होऊन मामलि अनेक वर्षांचें वेतन, इनामी उत्पन्न इत्यादींच्या पैशाची भरपाई करण्यांत येते. मग पूर्वीच्या दिरंगाईच्या काळांत तसें होत असल्यास त्यांत अपूर्व असें काय आहे ? तात्पर्य फर्मानांतील सुहूर सनाचा उल्लेख त्या फर्मानाच्या कालाचें निर्णायक गमक होऊं शकणार नाहीं.

या खंडांत प्रसिद्ध केलेल्या फर्मानांत कांकी ( काणिके ), परकी ( बेडिके ), नदी टोकरा, गावझरोंदखाना, कावली असे पांच सामान्यत: महाराष्ट्रांतील कागद्‌पत्रांत न आढळणारे हक्क उल्लेखिले आहेत. काणिके म्हणजे नजर व बेडिके म्हणजे विनंति, प्रार्थना. तेव्हां दोहोंचा अर्थ नजर म्हणून व विनंति करण्यासाठीं द्यावयाचे कर असा होईल. नदी उतरण्यासाठीं कर्नाटकांत कातडें व बांबू यांच्या आपल्याइकडील काहिलीप्रमाणें मोठ्या पाट्या करतात त्यांस टोकरी म्हणतात. तेव्हां नदी टोकरा म्हणजे नदी उतरण्याच्या सोयीसाठीं घेतलेला कर होय. गाव झरोंदखाना म्हणजे गांवची आयुधशाळा; अर्थात् आयुधशाळेसाठीं घेतलेला कर. कानडी कोशांत कावलीचे रक्षण, रक्षक, गोठा, इत्यादि अर्थ दिले आहेत. तेव्हां कावलीचा परचक्रापासून रक्षण करण्यासाठीं द्यावयाचा कर असा अर्थ पुढें झाला असावा.

अक्षय्य तृतीया शक १८६१ } ग. ह. खरे.

# अनुक्रमणी.

# संक्षेप

अ., अ. आ–अली आदिलशाह
आ–आग्नेय
ई–ईशान्य
उ–उत्तर
ऐफासा–ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड व लेखांक
चौ–चौकोनी
जु.–जुलूस सन
द–दक्षिण
द. म. इ. सा.–दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड व पृष्ठ
न., ना. अ.–नाद अली
नै–नैऋत्य
प– पश्चिम
पू– पूर्व
फा– फार्सी
मु., मु. आ–मुहम्मद आदिलशाह
मो–मोठा
[ मो. जा. *] – मोकळी जागा
वझीरे.– वझीरे हुकूमत
वा.– वाटोळा
शि.– शिक्का
शिचप्र–शिवचरित्रप्रदीप
शिचसा., शि. च. सा.–शिवचरित्रसाहित्य खंड व लेखांक
शिभा–शिवभारत
सरे.–सरे मज्लिस
सु.–सुहूर सन
हि.–हिजरी सन
हुप–हुजूरच्या परवानगीनें

# ऐतिहासिक फारसी साहित्य

## तिसरा खंड



## १ अगडी–देसाई

या प्रकरणांत प्रसिद्ध होत असलेले कागद मला अगडी ( हावेरी–धारवाड ) येथें श्री. आबासाहेब व श्री. भय्यासाहेब बहादुर देसाई यांजकडे मिळाले. यांचे दोन भाग पडतात. एक अस्सल कागद व दुसरा पुस्तक किंवा घडीच्या रूपानें असलेले नकल कागद. या नकल कागदांचीं मूळेंही त्यांजपाशीं होतीं. पण तीं एका मित्रामार्फत भाषांतर करण्यासाठीं कोणा परकी गृहस्थाकडे दिलीं असून अजन त्यांच्या हातीं आलीं नाहींत. यामुळें कांहीं कागदांच्या बाबतींत नकलांवरच काम भागवावें लागत आहे. नकलांतील नेहमीचे दोष यांतही असणार हें उघड आहे.

| | | |
|---|---|---|
| ले. १ सु. ९८३<br>हि. ९९१ शाबान २० | १<br>الملک لله | श. १५०५ भाद्रपद वद्य ७<br>इ. १५८३ आगस्ट २९ |

فرمان همایون شرف صدوریافت بجانب کارکنان [*و] دیسایان [*و] مقدمان و رعایای قریات هورلے پوتے مقاصات (معنافات) معاملہ بنکاپور آنکہ شهور سنہ ثلاث ثمانین و تسع مایہ هنمنت گونده را [*بہ] مراحم پادشاهانہ و عواطف خسروانہ ممتاز و سرافراز گردانیده بسردیسای قریات مذکور نصب فرموده شده است کہ میراث ابدی و سرمدی او بوده باشد می باید کہ سردیسای گری باو رجوع داشتہ برقرار قاعده رعایت عزت نمایند و جمیع رعایاے در ماده گردد و حلال خواری دیوان تابع سخن او بوده باشند و در جمیع امور و اقدام نماید و بواجبی کوشند و آنچہ در باب تمشیت و تقویت مرام و رایت معلوم نمایند بعمل موافق ساختہ بجا[*آ]ورند تا دانند انعام

مہلے (انبلی) کہ باو مرحمت فرمودہ شدہ است بدین تفصیل
الوازم در گونے	اصہلے درکھدے	انعام زمین یکن تخم
سہ جتل	ہر دو حصہ	پنج کرو
باغ یک قطعہ	چہا [*ر] پائیلے

بدین موجب سال بسال جاری دارند و دنبالہ نمایند درین باب تجاوز ننمایند کہ با او مرحمت فرمودہ دھانیدہ شدہ است تعلیق نوشتہ گرفتہ اصل باز دھند برحکم فرمان ہمایون روند ۲۰ ماہ شعبان المعظم سنہ ۹۹۱

پروانگی حضور اشرف اعلی و سرسرنوبت با علاقع خان عالیشان دلاور خان امیر حیلہ (جملہ) کہ بندست محال خان اعظم بلال خان مسطور است

[मोडींत*] विषु संवछर शेके १५०३

[ सारांश* ]

२ रा इब्राहीम आदिलशाह→ कारकून, देसाई, मुकद्दम व रयत कर्यात होरलीपोटी मामले बंकापूर

हणमंतगौडास बादशाही कृपेनें उपर्युक्त कर्यातीच्या सरदेसगतीची मिरास नेमून दिली आहे. त्याजकडे ती चालवून तिच्या धार्न्यास मान द्यावा. रयतेनें त्याच्या सल्ल्याप्रमाणें वागून सरकारशीं निष्ठा दाखवावी. त्यास दिलेल्या इनामाचा तपशील असा : पाच कुडो बियाणाची जमीन, दरखंडीस...चार पायली, दर गोणीस तीन जितल, लवाजिमा व बागेचा एक तुकडा. येणेंप्रमाणें सालोसाल चालूं ठेवावें. ता. २० शाबान सन ९९१ [हि.*], सु. ९८३. हुजूरच्या परवानगीनें व दिलावरखानाच्या माहितीनें.

| | | |
|---|---|---|
| ले. २ सु. ९८३<br>हि. ९९१ शाबान २२ | २* | श. १५०५ भाद्रपद वद्य ९<br>इ. १५८३ आगस्ट ३१ |

[मोडींत*] विषु संवछर शेके १५०३

*यांत आलेला फार्सी मजकूर मामुली व जवळजवळ वरच्या सारखाच असल्यामुळें गाळला आहे. फक्त सारांश दिला आहे.

[ सारांश* ]

२ रा इब्राहीम आदिलशाह → खुर्शीदखान नायब गैबत व कारकून
मामले दारुल-फतह बंकापूर

हनुमंतगौडास बादशाही कृपेनें उपर्युक्त मामल्यांतील कर्यातीच्या सरदेसगतीची मिरास नेमून दिली आहे. त्याजकडे ती चालवावी व तिच्या धाऱ्यांस मान द्यावा. रयतेनें त्याच्या सल्ल्यांत राहून व त्यास मदत करून सरकारशीं निष्ठा दाखवावी. त्यास दिलेल्या इनामाचा तपशील: मौजे लखमापूर कर्यात तिळवल्ली, दर गोणीस उभा मार्ग तीन जितल, कर्यात होरलीपोटी मध्यें दर गोणीस ३ जितल, पाच कुडो बियाणाची जमीन, दर खंडीस चाळीस ( चार ) पायली, एक बागेचा तुकडा, कर्यात राणे बेन्नूर, सरदेसायाकडे पूर्वीं चालू होती ती बाग, शिवाय होलीपली मौजा, उभा मार्ग दरगोणीस ३ जितल, दर खंडीस चार पायली, केरूर खुर्द कर्यातींत दर गोणीस ३ जितल, बागेचा एक तुकडा व पाच कुडो बियाणाची जमीन. हें सर्व कायम समजून वंशपरंपरेनें त्याजकडे चालवावें. ता. २२ शाबान सन ९९१ [ हि.* ], सु. ९८३. हुजूरच्या परवानगीनें व दिलावरखानाच्या माहितीनें.

३

| | | |
|---|---|---|
| ले. ३<br>हि. १०३५ जिल्हेज १८ | هوالخلیل<br>الملک لله | श. १५४८ भाद्रपद वद्य ५<br>इ. १६२६ आगस्ट ३१ |

فرمان همایون شرفٔ صدور یافت آنکہ دیسائی پرگنہ گوتل
بداند کہ درین وقت شجاعت [*و] رفعت دستگاہ میرعلی رضا
حوالدار معاملہ بنکاپور و بعضی محلات در باب دولت خواہی و
جانسپاری کہ او در مصلحت کنگ نایک حرام خوار بظہور
می رساند بدرگاہ والا معروض داشتہ بود روشن شد شاد
باش کہ این معنی مستحسن طلع اشرف گردید چون او
دیسائی حلال خوار و میراث دار قدیم است می باید کہ نیز
هم در باب سرانجامی مصلحت آنطرف چنانچہ مشارالیہ بگوید
دانموجب سرانجام نماید کہ موجب سرافرازی او است

تا داند بر حکم فرمان اشرف رود تحریراً فی ۱۸ شهر ذیحجہ
سنہ ۱۰۳۵

پروانگی حضور اشرف اقدس همایون اعلی باعلام
رکن السلطنہ العلیہ العالیہ فرزندی شاه نواز خان میر محلتی
(مجلسی) و وزیر حکومت

[मोडींत*] क्रोध नाम संवछर शेके १५४७

[सारांश*]

२ रा इब्राहीम आदिलशाह → देसाई परगणे गुत्तल

सांप्रत मामले बंकापूर व इतर महाल यांचा हवालदार मीर अली रजा यानें, हरामखोर केंमनायक यावरील मसलतीच्या बाबत त्यानें (देसायानें) राजनिष्ठा व प्राणार्पणबुद्धि दाखविली तिजविषयीं, लिहिलें तें समजलें व पसंतीस आलें. शाबास. तो जुना, मिरासदार व एकनिष्ठ देसाई आहे. त्यानें त्या बाजूच्या मसलतीच्या व्यवस्थेबाबत तो (हवालदार) सांगेल त्याप्रमाणें करावें. तें त्याच्या उत्कर्षास कारण होईल. फर्मानाप्रमाणें अमल करावा. ता. १८ जिल्हेज सन १०३५ [हि.*]. हुजूरच्या परवानगीनें व शाहनवाझखानाच्या माहितीनें.

| | | |
|---|---|---|
| ले. ४<br>हि. १०४० रखर २४ | ४<br>نقل | श. १५५२ कार्तिक वद्य १०<br>इ. १६३० नोव्हेंबर १९ |

پروانہ بمہر خان والاشان شیر خان فوجدار و جاگیردا
پرگنہ ہوکے ہنور از قرار بتاریخ بیست چہارم ۲۴ ربیع الثانی
سنہ ۱۰۴۰ آنکہ عاملان پرگنہ ہوکے ہنور جاگیر سرکار بدانند کہ
خدمت دیسموکہی و دیسپاندگی محل مذکور بدستور سند سابق
بهنمنت گونده دیسموکهی و دیسپاندیہ آنجا مقرر دانستہ رسوم
دیسموکہی سہ صد هون دوازده نیم هون و رسوم دیسپاندگی
سہ سد هون دهرن و موضع بلیہ کوندی بصیغہ دیسموکہی و موضع
دانورپی بصیغہ دیسپاندی پرگنہ مسطور کہ بموجب سند سابق
دستور انعام اوست بدستور سند سابق موافق گذاشتہ باشند
مزاحم نشوند و نقل پروانہ گرفتہ اصل واپس بدهند هرسال

استدعای سند مجدد نکنند درین باب تاکید بلیغ شناسند قامی شد

[मोडींत*] प्रमोदूत संवछर शेके १५५२

[ सारांश* ]

शेरखान फौजदार व जागीरदार परगणे होळे होन्नूर → अमलदार परगणे होळे होन्नूर जागीर सरकार

वरील महालाच्या देशमुखीची व देशपांडगीची चाकरी पूर्वीच्या सनदेप्रमाणें तेथील देशमूख व देशपांडे हनुमंतगौडा याकडे कायम आहे. देशमुखीचा रुसूम २१२॥ होन आणि देशपांडगीचा रुसूम ३०० होन धरण(?), शिवाय देशमुखीच्या नात्यानें बन्यहगोंदी आणि देशपांडकीच्या नात्यानें दांवरपी—दोन्ही वरील परगण्यांपैकीं—हीं गावें पूर्वीच्या सनदेप्रमाणें त्यास इनाम आहेत. तरी वरील गोष्टी त्याजकडे चालवाव्या. अडथळा करूं नये. ता. २४ रबिलाखर सन १०४० [ हि.* ].

५

| | | |
|---|---|---|
| ले. ५ सु. १०३९ | هوالخلیل | श. १५६० मार्गशीर्ष शुद्ध ४ |
| हि. १०४८ शाबान ३ | الملک لله | इ. १६३८ नोव्हेंबर २९ |

[नाद् अलीचा शिक्का* ]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب دیسایان پرگنہ پنگاوتی آنکہ از شہور سنہ تسع ثلاثین و الف از راہ مراحم بادشاهانہ و فرط عواطف خسروانہ پرگنہ مذکور در وجہ مقاصائی هنمنت گوندہ مع کل باب مرحمت فرمودہ دهانیدہ شدہ است می باید کہ پرگنہ مذکور دنبالہ نمایند و در قبض و تصرف او باز گذارند تادانند برحکم فرمان اشرف روند تحریراً فی سیوم شہر شعبان سنہ ۱۰۴۸

[ समासांत* ] پروانگی حضور اشرف اقدس همایون اعلی ١

१ पाठीवर मोडींत 'फर्मान देसाई गगावती बमामुला', हणवतगौ, हणमसगौडास मोकासा' व कानडींत ಗಂಗಾವತೀ ಮೊಕಾಸಿಕ್ಕೆ असे शेरे.

[ सारांश* ]

मुहम्मद् आदिलशाह → देसाई परगणे गंगावती

परगणे मजकूर हनुमंतगौडा यास मुकासा म्हणून दिला आहे. तरी तो त्याच्या ताब्यांत द्यावा. ता. ३ शाबान सन १०४८ [हि.*], सु. १०३९. हुप.

६

| | | |
|---|---|---|
| ले. ६ सु. १०४२<br>हि. १०५१ शव्वाल ४ | هوالخلیل<br>الملک لله | श. १५६३ पौष शुद्ध ६<br>इ. १६४१ डिसेंबर २७ |

فرمان همایون شرف صدور یافت بجانب دیسایان پرگنه گنگاوتی آنکه از شهور سنه اثنی و اربعین و الف ازراه مراحم پادشاهانه و فرط عواطف خسروانه پرگنه مذکور بابت نوسنچنی نسبت اورچپا نایک دیسائی پرگنه کنگیری دروجه استقامت مقدم الامثال هنمنت گونده دیسای سمت گوتل مع کل باب مرحمت فرموده دهانیده شده است می باید که پرگنه مذکور دنباله نمایند و در قبض و تصرف مشارالیه باز گذارند تادانند برحکم فرمان اشرف روند تحریراً فی لتاریخ چهارم ماه شوال سنه ۱۰۵۱

پروانگی حضور اشرف اقدس همایون اعلی

[ सारांश* ]

मुहम्मद् आदिलशाह → देसाई परगणे गंगावती

कनकगिरीचा देसाई ऊडचप्पा नायक याजतर्फेचा नौसंचणीचे बाबतींतील परगणे मजकूर ( गंगावती ) गुत्तल समतेचा देसाई हनुमंतगौडा याजकडे सर्व बाबींसह मुकासा म्हणून दिला आहे. तरी वरील परगणा हनुमंतगौडाच्या ताब्यांत द्यावा. फर्मानाप्रमाणें अमल करावा. ता. ४ शव्वाल सन १०५१ [ हि.* ], सु. १०४२. हुप.

७

ले. ७ मु. १०४४ } هوالخليل { श. १५६५ फाल्गुन शुद्ध ११
हि. १०५३ जिल्हेज ९ } الملک لله { इ. १६४४ फेब्रुवारी ८

[ मु. आ. लहान वा. शि.*]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب عزت و رفعت دستگاه سدی دلاور حوالہ دار و کارکنان حال و استقبال معاملہ بنکاپور آنکہ از شهور سنہ اربع و اربعین و الف درین ولا هنمنت گونده دیسائی سمت گوتل معاملہ مذکور بدرگاه معلی التماس نمود کہ نارگوندکی سمت مذکور و سمت هرکلی و سمت هورلی پولی و سمت کرور خورد و سمت تلولی معاملہ مذکور میراث قدیم خود است و بہوگوتہ میشود درین وقت کریم شرزه غیر واقع معلوم نموده فرمان حاصل کرده است خود نارگونده قدیم میراثی ام نظر عنایت ارزانی داشتہ نارگوندکی های قدیم خود بخود مقرر و مستقیم فرموده فرمان حجت عاطفت شود بنابران احوال بخاطر مبارک اعلی آورده نارگوندکی ها مذکور از کریم شرزه دور نموده بہ هنمنت گونده مذکور مقرر و مستقیم فرموده شده است می باید کہ نارگوندکی سمت هائی مذکور بہ هنمنت گونده مذکور مقرر دانستہ دنبالہ نمایند و روان دارند بعد او باولاد و احفاد او جاری سازند تعلیق نوشتہ گرفتہ اصل فرمان باز دهند بر حکم فرمان اشرف روند تحریراً فی ۹ شهر ذی الحجہ سنہ ۱۰۵۳

[ समासांत*] پروانگی حضور اشرف اقدس همایون اعلی ۱ [ *

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → सीदी दिलावर हवालदार व कारकून मामले बंकापूर

या वेळीं हनुमंतगौडा देसाई समत गुत्तल मामले मजकूर यानें दरबारास विनंति केली कीं, मामले मजकुरांतील गुत्तल, हडगली, होरलपोली,

---

१ पाठीवर कानडींत ಅಯಿದು ವೂಹಲ ನಾಡಗಾಡಿಕೆ ವೊಕರರ ಫರ ವೂನ व मोडींत ' नि॥ हणमंतगौडा गुतल ' असे शेरे.

केरूर खुर्द व तिळवळ्ळी या समतांच्या नाडगौडकीची मिरास पूर्वीपासून माझी आहे व भोगोटा चालूं आहे. सध्यां करीम शईह यानें खोटें सांगून फर्मान मिळविलें आहे. मी जुना मिरासी नाडगौडा आहे. तेव्हां कृपादृष्टीनें माझ्या जुन्या नाडगौडक्या मजकडे कायम करून तसें फर्मान व्हावें. ही हकीकत मनास आणून उपर्युक्त नाडगौडक्या करीम शईहकडून दूर करून हनुमंतगौडाकडे कायम केल्या आहेत. तरी त्या त्याजकडे मुकरर झाल्या आहेत असें समजून वंशपरंपरा दुमाले कराव्या व चालूं ठेवाव्या. तां. ९ जिल्हेज सन १०५३ [ हि.* ], सु. १०४४. हुप.

८

| | | |
|---|---|---|
| ले. ८ सु. १०४५ | هوالخلیل | श. १५६६ मार्गशीर्ष शुद्ध ११ |
| हि. १०५४ शव्वाल १० | الملک لله | इ. १६४४ नोव्हेंबर ३० |

[ मु. आ. लहान वा. शि.* ]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب دیسایان حصار رتهلی آنکه از شهور سنه خمس و اربعین و الف از راه مراحم پادشاهانه و فرط عواطف خسروانه قریات رانی بنور حصار مذکور بابت انکس خان در وجه استقامت خان عالی شان سعادت نشان رفیع القدر و المکان خوند میر انکس خان مع کل باب مرحمت فرموده دهانیده شده است می باید که قریات مذکور دنباله نمایند و در قبض و تصرف خان عالی شان مومی الیه باز گذارند تادانند برحکم فرمان اشرف اقدس همایون اعلی روند تحریراً فی التاریخ دهم ماه شوال سنه ۱۰۵۴

پروانگی حضور اشرف اقدس همایون اعلی ۱ [ समासांत* ]

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → देसाई हिसार रट्टेहळ्ळी

हिसार मजकुरापैकीं अंकुसखानाच्या बाबतींतील कर्यात राणे बेन्नूर खुन्द मीर अंकुसखान यास सर्व बाबींसह दिली आहे. तरी ती उपर्युक्त खानाच्या ताब्यांत द्यावी. ता. १० शव्वाल सन १०५४ [ हि.* ], सु. १०४५. हुप.

१ पाठीवर कानडींत ರಾಣೇಬೆಂನೂರ ಖೋದಮೀರ ಅಕುಸಖಾನಗೆ ಮೋಕಾಸಿ ಕೊಟದು ರಾಣೇಬೆಂನೂರು व मोडींत 'नि॥ खोदमीर अंकुसखान' असा मजकूर

१

| | | |
|---|---|---|
| ले. ९ सु. १०४५<br>हि. १०५५ जमर १६ | هوالخليل<br>الملك لله | श. १५६७ श्रावण वद्य २<br>इ. १६४५ जुलै ३० |

[ मु. आ. लहान वा. शि.* ]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب مقدم الامثال نعمت گونده دیسائی سمت گوتل معامله بنکاپور آنکه از شهور سنه خمس و اربعین و الف چون سمت هرگلی معامله مذکو به استقامت مقدم الامثال و الاشباه کینگ نایک برحکم فرمان سابق روانست اما عاملان شاهزاده عالمیان [ मो. जा.* ] خلل نموده قابض شدن نمی دهند هرگاه که سمت مذکور به استقامت نایک مشارالیه مرحمت شده باشد عاملان شاهزاده عالمیان [मो. जा.*] خلل نموده قابض شدن ندادن چه معنی دارد اکنون می باید که بمجرد وصول فرمان قضا جریان شاهی سمت مذکور خارج حصار هولل در وجه استقامت نایک مشارالیه برحکم فرمان سابق مقرر و مرحمت دانسته بلا عذر و اهمال قابض شدن بدهد و در قبض و تصرف نایک مشارالیه باز گذارد و عاملان شاهزاده عالمیان [मो. जा.*] را خلل کردن ندهد درین باب تاکید بلیغ دانسته باز فریاد آمدن ندهد تادانند تحریراً فی التاریخ ۱۶ ماه جماد الثانی سنه ۱۰۵۵

[समासांत*] پروانگی حضور اشرف اقدس همایون اعلی

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → हनुमंतगौडा देसाई संमत गुत्तल मामले बंकापूर

मामले मजकुरापैकीं संमत हडगली पूर्वीच्या फर्मानाप्रमाणें केन्ना-नायक याजकडे चालूं असतां शाहझादा आलमिया...चे अमलदार अडथळा करून ताब्यांत घेऊं देत नाहींत. संमत मजकूर उपर्युक्त नायकास दिली असतां शाहझाद्याच्या अमलदारांनीं अडथळा करून ती ताब्यांत घेऊं देऊं नये याचा अर्थ काय ? आतां हें फर्मान पोहोंचतांच उपर्युक्त संमत ( होळलच्या गढीखेरीज ) उपर्युक्त नायकास पूर्वीच्या फर्मानाप्रमाणें

दिली आहे असें समजून ताबा घेऊं द्यावा. शाहझाद्याच्या अमलदारांना अडथळा करूं देऊं नये. या बाबतींत सक्त ताकीद जाणून फिर्याद येऊं देऊं नये. ता. १९ जमादिलाखर सन १०५५ [ हि.* ], सु. १०४५. हुप.

१०

| | | |
|---|---|---|
| ऐ. १० सु. १०४९<br>हि. १०५८ जिल्हेज २२ | [هوالخليل]<br>الملك لله | श. १५७० पौष वद्य ८<br>इ. १६४८ डिसेंबर २७ |

[ मु. आ. लहान वा. शि.* ]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب شجاعت مآب شیخ احمد جنیدی سلحدار جمع رکاب نامزد بر تهانداری و دیسائیان قریات رانی بنور حصار رتهلی آنکه از شهور سنه تسع اربعین و الف چون قر[یات] ... ت نواب خان بابا مرحوم که دریں وقت بجهت سنچنی خاص خیل حوالہ سیدی سنبل حضور ... بود اکنون از راه مراحم پادشاهانه و فرط عواطف خسروانه قریات مذکور در وجه استقامت فرزند ارشد ارجمند کامگار موید منصور بختیار قرة باصرهٔ دولت و اقبال غرهٔ ناصیهٔ حشمت و اجلال درة التاج سلطنت کبری خلف صدق خلافت عظمی مطلع انوار عنایت الهی محیط انظار عواطف شاهنشاهی طغرا مثال کام بخشی عنوان دیباچه فیروز مندی والا گهر عالی مقدار شاهزاده بلند اقبال فیروزی آثار [*मो. जा.] مع کل باب عاطفت فرموده دهانیده شده است می باید که قریات مذکور دنباله نمایند در قبض [*و] تصرف متعلقان فیروزی آثار مومی الیه باز گذارند تادانند برحکم فرمان اشرف اقدس روند تحریراً فی ۲۲ ماه ذی الحجه سنه ۱۰۵۸

پروانگی حضور خورشید ظهور اشرف اقدس [ समासांत* ]
همایون اعلی

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → ठाणेदारीवर मुद्दाम नेमलेला शेख अहमद जुनैदी शिलेदार आणि देसाई कर्यात राणे बेन्नूर हिसार रट्टेहळ्ळी.

मरहूम नवाब खान बाबा याचे बाबतींतील कर्यात [ मजकूर ], जी सध्यां खासखैलीच्या संचणीसाठीं सीदी सन्बुल...... याच्या हवाला होती ती, आतां मुकासा म्हणून ——————— यास दिली आहे. तरी ती दुमाला करून उपर्युक्ताच्या मुतालिकांचे ताब्यांत द्यावी. ता: २२ जिल्हेज सन १०५८ [हि.*], सु. १०४९. हुप.

११

| | | |
|---|---|---|
| ले. ११ सु. १०४९<br>हि. १०५९ मुहर्रम २० | هوالخليل<br>الملک لله | श. १५७० माघ वद्य ६<br>इ. १६४९ जानेवारी २४ |

[ मु. आ. लहान वा. शि.* ]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب عاملان و دیسایان سمت کوتل آنکه از شهور سنه تسع اربعین و الف درین ولا بدرگاه سلیمان بارگاه [ ر]وشن گردید که لکهپا برال و بعضے بقالان الندکار رعیت محل دربست کوتهی تنخواه راتب خاصه شریفه مع گاو های جامه در موضع کللکور سمت کاردگی فروز آمده بودند پتیل موضع کوئبال سمت کندگول با پتیلان موضع انکلگی و موضع کمندولی و موضع ترل کهب و سنوی متفق گشته و جمعی کثیر از دزدان بهم رسانیده بر سر بیرکی بقالان مذکور تاخته چند کس بقالان و محل دار را زخمی ساخته چهار نگ جامه و یک کنتهالی زر برده و قبل ازین سه نگ جامه بابت سدپا شابادی دزدیده بود جمله هفت نگ و یک کنتهالی از دزدی برده ازین ممر بقالان محل مذکور رنجیده ترک کسب و کار خود نموده و در عمل حاصل محل مذبور تخلل یافته است هرگاه که بقالان محل مذکور مع گاوهای رتار و بهرتار از ولایت قلمرو آمد و رفت و خرید و فروخت نموده حاصل می داده باشند چه قدرت و مجال پتیل موضع کوئبال مذکور است که پنداوه و راه‌زنی و دزدی نماید اکنون می باید که بمجرد وصول فرمان قضا جریان شاهی از تهانه احشام فرستاده پتیل موضع کوئبال مذبور را بدست آورده هر قدر نگهائی جامه و زر وغیره از بقالان مذکور و بعضے برده باشد

تمام و کمال ذره بذره جائگیر ساختہ بدرگاه معلی بفرستند و اورا چنان گوشمال و تادیب نمایند کہ من بعد ترک پنداوه و دزدی و راهزنی نموده بحال خود باشد درین باب تاکید بلیغ و قدغن عظیم لازم دانستہ حسب الحکم جهان مطاع عالم مطیع بعمل آورند تا دانند تحریراً فی ۲۰ شهر محرم الحرام سنہ ۱۰۵۹

[समासांत*]१ پروانگی حضور پر نور اشرف اقدس همایون اعلی

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → अमलदार व देसाई समत गुत्तल.

यावेळीं दरबारास समजलें कीं, लखप्पा बराल व अळंदचे इतर बक्काल—कोठीखात्याकडील व खासे नोकर—हे कापडाचे बैल घेऊन कलगूर समत कारडगी येथें मुक्कामास आले होते तेव्हां, मौजे कोयबाल समत कुंदगोळ येथील पाटलानें मौजे अंकलगी, कमंडोली, तरलखब, सन्वी ( संवसी ) या गावचे पाटील व पुष्कळ चोर यांस बरोबर घेऊन, बक्कालांवर झडप घालून आणि बक्काल व महलदार यांचे कांहीं लोक जखमी करून कपड्याचे चार नग व सोन्याची एक कंठाळी लांबविली. यापूर्वी सिद्प्पा शाबादी (शाबावी ?) याचे कापडाचे तीन नग चोरले होते. एकूण सात नग व एक कंठाळी चोरून नेली. या योगें वरील खात्याचे बक्काल रंजीस येऊन व स्वतःचा कामधंदा सोडून स्वस्थ बसले आहेत आणि वरील खात्याच्या वसूलाबाबत अडथळा आला आहे. वरील खात्यांतील बक्काल रिते व भरलेले बैल घेऊन कलमरू भागाशीं येजा व खरेदीविक्री करून वसूल देत असल्यामुळें मौजे कोयबालच्या पाटलास पुंडावा, वाटमारी व चोरी करण्याची काय ताकत व मजाल आहे. आतां हें फर्मान पावतांच ठाण्याहून हशम पाठवून वरील पाटलास दुस्त करावें आणि बक्काल व इतर यांचे कापडाचे नग व द्रव्य वगैरे जें पळविलें असेल तें सर्वच्या सर्व हस्तगत करून दरबाराकडे पाठवून द्यावें. तसेंच त्यास अशी तंबी द्यावी कीं, पुंडावा, वाटमारी व चोरी सोडून देऊन तो नीट राहील. या बाबतींत सक्त ताकीद जाणून फर्मानाप्रमाणें अमल करावा. ता. २० मोहरम सन १०५९ [हि.*], सु. १०४९. हुप.

---

१. पाठीवर कानडींत ಕುಯಿಬಾಲ ,... ಗೋಲ್ಕೊಂಡ ... व मोडींत ' फर्मान सा॥ गुतल ' असे शेरे.

१२

ले. १२ सु. १०४९ | هوالخليل | श. १५७० फाल्गुन वद्य १४
हि. १०५९ सफर २७ | الملک لله | इ. १६४९ मार्च २

[मु. आ. मोठा वा. शि.*]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب مقدم الامثال هنمنت گونده گوتل آنکه از شهور سنه تسع اربعین و الف درین ولا حکم جهان مطاع آفتاب ارتفاع نافذ گشته که آن مقدم الامثال معه جمعیت و احشام جهت مصلحت پادشاهی لشکر ظفر پیکر نزد ایالت و امارت پناه ابهت و شوکت دستگاه حکومت و معالی جاه اعتضاد خلافت و فرمان روای اعتماد سلطنه و کشور کشای فص خاتم شجاعت و بختیاری آب گوهر شهامت و جانسپاری سیف مسلول بازوی شاهنشاهی رمح مصقول معرکه دشمن کاهی مقدمه الجیش معارک ملک گیری ........ پیش آهنگ مصاف فیروزی و کامرانی طراز آستین ابهت و اجلال گوهر سریر دولت و اقبال مخزن اسرار خلیفه الهی مجموعه هوشمندی و کارآگهی [موسس] وحدت سرای حضور محرم خاص الخاص سریر سرور مطرح انظار عنایت مورد الطاف قدسی سرایت انیس مجلس وحدت [جلیس محفل خلوت] عالیشان رفیع مکان خلاصه امرا منیع الشان زبدهٔ خوانین زمین و زمان سعادتمند ازل و ابد مبارزالدین خان محمد وزیر حکومت برود باید که بوصول فرمان... عظیم الشان آن مقدم الامثال حسب الحکم اشرف پیش حکومت پناه معزالیه رفته کمر فدویت برمیان جان بسته آثار حلال نمکی درگاه معلی بظهور رساند که درضمن آن سرافرازی او است درین باب قدغن عظیم لازم شناسد تا داند تحریراً فی ۲۷ شهر صفر سنه ۱۰۵۹*

---

* पाठीवर कानडींत ಚಂದಿಗೆ ಮಸಲತಿಗೆ ಹೋಗುವಕೆ ಫರ್ಮಾನ असा शेरा.

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → हनुमंतगौडा गुत्तल

या वेळीं हुकूम सुटत आहे कीं, त्यानें आपली जमेत व हशम घेऊन पादशाही मसलतीसाठीं लश्करासह मुबारिझुद्दीन खान मुहम्मद–वझीर हुकूमत–याजपाशीं जावें. तरी हें फर्मान पोहोंचतांच त्यानें हुकुमाप्रमाणें उपर्युक्त हुकूमत–पनाहाच्या पुढें जाऊन व जीवादारम्य चाकरीची हिंमत धरून दरगाहाच्या कृतज्ञतेच्या चिन्हांचें आविष्करण करावें. यांत त्याचें ऊर्जित आहे. या बाबतींत सक्त ताकीद जाणावी. ता. २७ सफर सन १०५९ [ हि.* ], सु. १०४९. हुप.

१३

| | | |
|---|---|---|
| ले. १३ सु. १०४९ <br> हि. १०५९ जवल २ | هوالخلیل <br> الملک لله | श. १५७१ ज्येष्ठ शुद्ध ४ <br> इ. १६४९ मे ५ |

[वर्तुळांत*] در زیر نگین شد هفت اقلیم - شاه دین محمد ابراهیم

فرمان همایون شرف صدور یافت بجانب عاملان و دیسایان
سمت کرور معاملہ بنکاپور آنکہ از شهور سنہ تسع اربعین و الف
چون زرتحفہ تعلق میراث های و بعضے بابت گووند نایک و تماجی
نایک مبلغ چهارهزار هون وصول دو سالہ جهت سنہ المذکور
دو هزار هون و سنہ خمسین الف دو هزار هون مقرر نموده
دروجہ تنخواه راتب خاصہ شریفہ روانست دران میراث مهجنکی
پیت ابراهیم پور سمت مذکور کہ بولپا دیسای معاملہ مذکور
میکند آنرا تحفہ یک صد هفتاد پنج هون وصول دوسالہ جهت
سنہ المذکور هشتاد و هفت هون و نیم و سنہ خمسین الف
هشتاد و هفت هون نیم مقرر فرموده شده است می باید کہ
زر مذکور بوصول رسانیده بمحل راتب مرسول دارند و اگر
زر دادن حرکت و عذر پیش آرند خق لوازمہ و انعام و بعضے
امانت نموده سرانجام کرده بفرستند تا دانند حسب الحکم جهانمطاع
عالم مطیع بعمل آورند تحریراً فی تاریخ ۲ ماه جمادی الاول
سنہ ۱۰۵۹

پروانگی خضور پر نور اشرف اقدس همایون اعلی.

[मोडींत*] रणेधीर रणेसूची हनुमंतगौडा सन १०५९ सर्वधारी संवछर शेके १५७१

[सारांश*]

मुहम्मद आदिलशाह → अमलदार व देसाई समत केरूर मामले बंकापूर गोविंद नायक व तिम्माजी नायक यांच्या बाबतींतील व मिरासी संबंधींच्या नजराण्याचा दोन सालांतील चार हजार होन वसूल–प्रस्तुत सालचा दोन हजार व सन १०५० सालचा दोन हजार–कायम करून खाशाच्या रातिबाचा तनखा म्हणून चालू आहे. वरील समतेमधील इब्राहीमपूर पेठेच्या महाजनकी–ही वरील मामल्याचा देसाई बुळप्पा करीत आहे–बद्दल दोन सालांत–प्रस्तुत सालीं ८७॥ होन व १०५० सालीं ८७॥ होन–मिळून १७५ होन नजराणा कायम केला आहे. हा पैसा वसूल करून रातिब खात्याकडे धाडून देण्याचें करावें. जर पैसा देण्यास हरकत करतील तर हकलवाजिमे, इनाम व इतर अमानत करून व व्यवस्थेनें त्यांस पाठवून द्यावें. ता. २ जमादिलावल सन १०५९ [हि.*], सु. १०४९. हुप.

१४

ले. १४ सु. १०४९ } هوالخليل { श. १५७१ श्रावण शुद्ध १५
हि. १०५९ शाबान १३ } الملک لله { इ. १६५९ आगस्ट १२

[मु. आ. मोठा वा. शि. *]

بری صاحبہ

فرمان همایون شرف صدور یافت بجانب هنمنت گونده دیسائی سمت کوتل آنکہ از شهور سنہ تسع اربعین و الف چون سمت کرور معہ پیت معاملہ بنکاپور بمایحتاج محل علیا جناب عصمت مآب پرده نشین تتق (تبق ؟) عزت سپهر (شهر ؟) یاری حجلہ گزین سرادقات حشمت و کامگاری بلقیس الزمان خدیجہ الدوران طهارت پناهی حدارت دستگاهی ناموس العالمین مشهور الخافقین ... دامت عصمتها و عفتها الی یوم الدین روانست درین ولا بدرگاه معلی بارگاه روشن گردید کہ ملور لکهم ؟ و سایتها منجی و بهرپا کرل و چنیا گونده کنیکوپ این چهار نفر از روی متمردی بدیهای سمت مذکور تسویش و ازار رسانیده گاو

کورو بردہ اند چہ حد و اندازہ آنہا باشد و او دیسائی شدہ متمردان مذکور را گوشمال ندادہ خاموش می باشی چہ معنی دارد اکنون می باید کہ بمجرد وصول فرمان قضا جریان شاہی متمردان مذکور را تادیب بواجبی نمودہ از دیہای سمت مذکور آنچہ گاو کورو بردہ اند تمام در حال رہا گردانیدہ بدہاند و پیشتر آنہا را چنان تنبیہ و تاکید نماید کہ محال دیہای سمت مذکور بہیچ وجہ من الوجوہ مزاحم نرسانیدہ بحد خود باشد و رفع تشویش آنہا شدہ ولایت سمت مذکور معمور گشتہ دست سال بسال زیادہ بستہ پی در پی رسد می آمدہ باشد تا دولت خواہی او ظاہر شود باین معنی سعی و ... درین ... سرافرازی او است تادانند حسب الفرمودہ اشرف اقدس ہمایون اعلی بعمل آورد تحریراً فی تاریخ ۱۳ شہر [ شعبا]ن المعظم سنہ ۱۰۵۹

[समासांत*] پروانگی حضور خورشید ظہور اشرف اقدس ہمایون اعلی

मुहम्मद् आदिलशाह → हनुमंतगौडा देसाई समत गुचल

मामले बंकापूरपैकीं पेठेसह करूर समत बडी साहिबाच्या ताब्यांत चालू आहे. सध्यां दरगाहास समजलें कीं, मल्लूर लखप्पा ( मा ? ), साबनियां मन्ची, भरपा करल, चीनागौडा गनीकोप हे चार जण बंडाच्या रूपानें या समतेंतील गावांस तशवीश देऊन गुरेंढोरें घेऊन गेले आहेत. त्यांचें केवढें हें धाष्टर्य. आणि त्यानें देसाई होऊन बंडखोरांना शासन न देतां स्वस्थ असावें ह्याचा अर्थ काय ? आतां हें फर्मान पोहोंचतांच बंडखोरांस योग्य सजा देऊन ते जीं गुरेंढोरें घेऊन गेले असतील तीं सर्व तावडतोब सोडवावीं. आणि पुढें त्यांना अशी तंबी द्यावी कीं ते वरील समतेमधील गांवांत कोणतीही ढवळाढवळ न करतां आपल्या मर्यादेंत राहतील. आणि वरील समतेस त्यांपासून होणारा त्रास चुकून ती आबाद व्हावी. तसेंच हळूहळू सालो-

---

१ पाठीवर कानडींत ಚಿಕ ಕೆರಉರ ವಿಲಾತಿಗೆ ತಸು [ವಿ] ಸು ಕೊಡುಥಾರೆಂಬದಕೆ......ಉರ ಉಧಲೀ ಗುಡುಗಿನ ಕೊ......ವಲಿ ಗೋಶ್ಮಾಲ ಕೊಡಿಯುಂದು ಬರಸಿದೆವೆ असा व मोडींत 'निा बडे साहेबा' असा मजकूर.

साल वाढता दस्त मिळावा. म्हणजे त्याची राज्याविषयींची सदिच्छा व्यक्त होईल. या दृष्टीनें प्रयत्न करावा. यांत त्याचें अतिशय ऊर्जित आहे. फर्मानाप्रमाणें अमल करावा. ता. १३ शाबान सन १०५९ [हि.*], सु. १०४९. हुप.

ले. १५ सु. १०५२ } १५ { श. १५७३ माघ वद्य १३
हि. १०६२ सफर २६ } { इ. १६५२ जानेवारी २८

بسم الله الرحمان الرحیم

الملک لله

[मु. आ. मोठा वा. शि. *]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب مقدم‌الامثال هنمنت گونده دیسائی گوتل آنکه از شهور سنه اثنی خمسین و الف درین ولا ندرگاه والا جاه روشن گردید که بعد از وفات خان گونده دیسائی پرگنه لکهمیسر کنچن گونده نام برادرش شیوه حرام خواری بظهور آورده در موضع سیرهتی پرگنه مذکور مانده انواع تمردی و فتنه انگیزی می کند بنابران برای دفع و گوشمال او از حضور فایض النور به شجاعت مآب خان سعادت نشان ابراهیم موسی خان با سپاه نامزد پرگنه مذکور فرموده شده است می باید که آن مقدم‌الامثال بمجرد وصول فرمان قضا جریان شاهی معه جمیعت و احشام خود باستواری تمام مهیا گشته فی الحال به پرگنهٔ مذکور رفته برفاقت و استصواب خان مومی الیه در و خر (دخیر؟) و هلاک محرک مذکور وطایف(؟) جانفشانی و حلال نمکی درگاه آسمان جاه بتقدیم رسانیده نیست نابود سازد لحظه و لمحه درنگ و اهمال نورزند تا مزید سرافرازی او گردد درین باب تاکید بلیغ قدغن عظم (عظیم؟) لازم شناشد تادانند بر حکم فرمان اشرف اقدس جهان مطاع عالم مطیع رود. تحریراً فی التاریخ بیست ششم شهر صفرالمظفر سنه ۱۰۶۲

[समासांत*] پروانگی حضور خورشید ظہور اشرف اقدس همایون اعلی

[ फार्सी मजकुराखाली कानडींत* ]

ಫರ್ಮಾನ ಹುಮಾಯುನ ಶರಫ ಸದುರ ಯಾಫ್ತ ಬಜಾನೆಬ ಮೊಕದಮುಲ ಯಿಮಸಾಲ ಗುತಳದ ಹಣಮಂತ ಗೊಂಡಗೆ ಬಯಿನಾಯಾತೆ ಬೆಗಾಯಾತ ಶಾಹಾನಾ ಉಂಕಿ ಅಜ ಸುಹುರ ಸೆನ ಯಿಹದೆ ಖಮುಸನ ವ ಅಲಫ ಸಾಂಪ್ರತ ದರಗಾಹಕೆ ಆ ಕೈಯಾದ ವಿವರ ಪರಗಣೆ ಲಕ್ಷ್ಮೆಶ್ವರದ ದೆಸಾಯಿ ಖಾನ ಗೊಂಡಸು ಬಲಾದುರ ಆದಮೆಲೆ ಅವನ ತಂಮ ಕೆಂಚಗೊಂಡನು ಹರಾಮ ಖೊರಿ ಪ್ರಕಟ ಮಾಡಿ ಮವುಜೆ ಸಿರಹಟ್ಟಿ ಪರಗಣೆ ಮಜಕುರನಲಿ ಯಿದು ಮುತಮರ್ದಿ ಮಾಡುತ ಯಿಧಾನೆ ಆದಶೆ ಅವನ ನಿರ್ಮೂಲ ಮಾಡೊ ವಿಶೆವಾಗಿ ಹುಜರದಿಂದ ಸುಜಲತಮಾಬ ಖಾನ ಸಾದತನಿಶಾನ ಯಿಬರಾಹಿಮ ಮುಸೆಖಾ ನರಿಗೆ ಕುದರಿಮಂದಿಸಹಿತ ಪರಗಣೆ ಮಜಕುರಿಗೆ ನಾಮಜದಿ ಮಾಡಿ ಅದೆ ಆದಶೆ ನಿನು ಫರ್ಮಾನ ಕಂಡಾಕ್ಷಣವೆ ಕುದರಿಮಂದಿಸಹಿತ ರವಾನೆ ಆಗಿ ಖಾನ ಮೊ ಮಿನಿಲೆಶ ವಿದ್ಯಮಾನದಿಂದ ಹರಾಮಖೊರಗೆ ಬುಧಿಗಲಿಸುವರ ವಿಶೆದಲಿ ನಿಂಮ ದೌಲತಖೊಹಿ ಪ್ರಕಟ ಮಾಡಿ ಅವನ ನಿರ್ಮೂಲ ಮಾಡುವದು ಯಿ ವಿಶೆದಲು ಆಲಶ್ಯ ಮಾಡಲಾಗದು ಯಿದರಿಂದ ನಿಂನ ಸರಫರಾಜಿ ಅದೆ ಯಿ ವಿಶೆದಲಿ ಬಹು ತಾಕಿದಿ ಯೆಂದು ತಿಳುವದು ತಾದಾನಂದ ಫರ್ಮಾನದಂತೆ ವರ್ತಿಸುವದು ಚಂದ್ರ ೨೬ ಮಾಹೆ ಸಫರ ಸನ ೧೦೬೨ ಪರವಾನಿಗಿ ಹುಜುರ *ಖುರಶೆದ* ಜಹುರ ಅಶರಫ ಆಕದಸ ಹುಮಾಯುನ ಆಲಾ

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → हनुमंतगौडा देसाई गुत्तल

सध्यां दरगाहास समजलें कीं, लक्ष्मेश्वर परगण्याचा देसाई खानगौडा मरण पावल्यावर त्याचा भाऊ कंचनगौडा हरामखोरीचा धंदा प्रकट करून परगणे मजकूरपैकीं मौजे शिरहट्टी येथें राहून तऱ्हतऱ्हेनें बंडखोरी करीत आहे. त्यास दफे व शिक्षा करण्यासाठीं हुजूरकडून इब्राहीम मूसाखान यास शिपायांसह वरील परगण्यावर खास नेमिलें आहे. तरी हें फर्मान मिळतांच त्यानें आपली जमेत व प्यादे घेऊन सर्व गोष्टींनीं तयार होऊन वरील परगण्यांत जावें आणि उपर्युक्त खानाच्या सल्ल्यानें व संगतीनें बंडखोरास मारून एकनिष्ठेत प्रगति करावी. त्यास नेस्त नाबूद करावें. क्षणाचा उशीर करूं नये. म्हणजे त्याचें जास्त ऊर्जित होईल. या बाबतींत सक्त ताकीद जाणावी. फर्माना-प्रमाणें चालावें. ता. २६ सफर सन १०६२[हि. *], सु.१०५२. छुप.

---

* पाठावर मोडींत 'पौ छ १२ रबिलवल' व 'नि॥ फतेखान सरसर नौबत' असे शेरे

| | | |
|---|---|---|
| ले. १९ सु. १०५५<br>हि. १०६५ रवल ४ | १९ | श. १५७६ पौष शुद्ध ६<br>इ. १६५५ जानेवारी ३ |

بسم الله الرحمان الرحیم

الملک لله

[ शिक्कयाचे बाबतींत ले. १३ प्रमाणें * ]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب هنمنت گونده دیسائی سمت گوتل معامله بنکاپور آنکه از شهور سنه خمس خمسین و الف درین ولا عزت و رفعت دستگاه حشمت و شوکت انتباه شجاعت و شهامت پناه معتمد درگاه سلطانی معتبر بارگاه خاقانی ملک عالی شان رفیع القدر و المکان ملک الامرای ملک ریحانرا جهته تنبیه و تادیب چترکل کار نابکار نامزد فرموده شده است می باید که بمجرد وصول فرمان قضا جریان شاهی احشام خود و بعضی استعداد قلعه گری (گیری) برای کمک ملک الامرای معزالیه فرستاده حرام خوار مذکور را گوشمال رسانیده دولت خواهی خود ظاهر نماید به این معنی باعث مجرای نیکو بندگی و بیشتر سرافرازی خود شناسد تادانند برحکم فرمان اشرف عمل نماید تحریراً فی التاریخ چهارم ماه ربیع الاول سنه ۱۰۶۵

پروانگی حضور خورشید ظهور اشرف اقدس همایون اعلی

[ मोडींत* ] हणमंतगौडा रणेधीर रणेसूची सन १०६५ मनंमथ संवछर शेके १५७७

[ सारांश* ]

मुहम्मद आदिलशाह → हनुमंतगौडा देसाई समत गुत्तल मामले बंकापूर

सांप्रत मलिक रैहानला चित्रकलकारांना तंबी देण्यासाठीं मुद्दाम नेमिलें आहे. तरी हें फर्मान पोहोचतांच स्वतःचे पावलोक व किल्ले घेण्याचे इतर सामान उपर्युक्त मलिकाच्या कुमकेसाठीं पाठवावें आणि वरील हरामखोरास शिक्षा करून राजनिष्ठा व्यक्त करावी. या योगें पुढें आपलें ऊर्जित होईल

असें जाणावें. फर्मानाप्रमाणें आचरण करावें. ता. ४ रबिलावल सन १०६५ [ हि.*], सु. १०५५. हुप.

ले. १७ स. } १७ { श.
हि. } ......ال { इ.

[ मु. आ. वा. मोठा शि.* ]

فرمان همایون شرف صدور یافت[1] ........
و نوازش و التفات خسروانه ممتا[زا] ........
در معامله محمدنگر بوفات رس[ید]......
خسروانه نایکی معامله مذکور و ......
مع خلعت فاخره جهته او فرستاد[ه] ......
و هیچ غم و الم پدر خود پیرامون خاطر گردید ......
در فدویت و جانسپاری درگا[ه]......
فدویت و نیکوبندگی درگاه بغایت الغایت بظهور ......
پروانگی حضور اشرف اقدس همایون اعلی[2] [ समासांत* ]

[ सारांश* ]

मुहम्मद् आदिलशाह → ......

......... मुहम्मदनगर मामल्यामध्यें मरण पावला ...... मामले मजकूरची नायकी ......... पोशाखासह त्याजसाठीं पाठविली आहे. ......आपल्या पित्याविषयींचें दुःख मनांत न आणितां दरबारची चाकरी व आत्मार्पण ... दरबारच्या सत्सेवकाचें कर्तव्य खूप खूप व्यक्त करावें. हुप.

---

१ या फर्मानाचा डाव्या अंगचा अर्धा भाग नाहींसा झाला असल्यानें यांतील वृत्ततंतू जागोजाग तुटला आहे. यावर मुहम्मद् आदिलशाहाचा शिक्का असल्यानें हें निदान त्याच्या कारकिर्दीचे शेवटीं निघालें असेल असें समजण्यास हरकत नाहीं. याच कल्पनेनें हें फर्मान येथें मुहम्मद्च्या फर्मानांचे अखेरीस घातलें आहे.

२ पाठीवर कानडींत ದಿಲಾರೀ ವಜಿರಿ ಮೊಕರರ ಫರಮಾನ ವಾ ಸರನಾ ಯಿತ ಯಿಕರಿ असा शेरा

ले. १८
हि. १०६७ रवल २९ } १८ { श. १५७८ माघ शुद्ध १
इ. १६५७ जानेवारी ५

بسم الله الرحمان الرحيم

الملک لله

[ ना. शि. * ]

فرمان همایون شرف صدور یافت آنکه مقدم الامثال هنمنته
گونده گوتل بعنایت بیغایت شاهانه امیدوار بوده بداند که
درین ولا بدرگاه جهان پناه روشن گردید که سیوا حرام خوار از
کم طالع بر جاده اطاعت فرمان برداری بند(بد)رگاه فلک جاه پا برون
نهنده (نهاده) بولایت پادشاهی مزاحمت رسانیده دست دراز نموده
است لهذه بجهت مندفع ساختن حرام خورمذکور نور حدیقه دولت
و بختیاری نوباوه باغستان حشمت برخورداری سعادت مند
اقبال همراه دولت خواه زاده درگاه جهان پناه لایق الرتبت و الاحسان
ارجمند بلند مکان محمد اخلاص خان فرزند رشید ایالت و امارت
پناه ابهت و شوکت دستگاه حکومت و معالی جاه اعتضاد خلافت
و فرمان برداری اعتماد سلطنه و کشور کشائی فص خاتم شجاعت
و بختیاری آب گوهر شهامت و جانسپاری سیف مسلول بازوی
شهنشاهی رمع مصقول معرکه دشمن کاهی مقدمه الجیش ...
و جهان ستانی پیش آهنگ مصاف فیروزی و کامرانی طراز
آستین ابهت و اجلال گوهر سریر دولت و اقبال مخزن اسرار
خلیفه الهی مجموع هوشمندی و کار آگاهی موس (سس) وحدت
سرای حضور محرم خاص الخاص سریر سزور مطرح انظار عنایت
مورد الطاف قدسی سرایت انیس مجلس وحدت جلیس محفل
خلوت عالیشان رفع (رفیع) منکان (مکان) خلاصه امرای منیع الشان
زبده خوانین زمن و زمان سعادت مند ازل و ابد مبارزالدین
فرزندی خان محمد وزیر حکومت را صوبه‌داری کرناتک تعین
نموده باوزرای عظام فرستاده شده بود بحضور آن طرف ماسور
با مردم خود ازمرد مان سیوا ناکردار بسی جنگ [*و] جدل مشقت
نموده بانهان شکسته(ت) داده در دولتخواهی و نیکوبندگی

درگاه بغایت الغایت می کوشد بنابران از راه مراحم پادشاهانہ[*و]
فرط عواطف خسروانہ موضع لیکدھلی بازاودو (؟) رفعت دستگاه
وزارت مآب اعظم خان دور نموده موضع کوتهی‌هال هر دو
دیہ حصار رتھلی در وجہ انعام ابدی و اکرام سرمدی (مدی)
بآن دولتخواه درگاه داخل محصول و نقدیات و بعضے وجوهات
کل باب داده شده اسب می باید کہ دیہا مذکور در قبض
تصرف آورده باولاد و احفاد تحت خود انعام دانند و کار
دولتخواهی و نیکوبندگی درگاه عرش اشتباه بکوشند درین
باعث سرافرازی اوست تادانند برحکم فرمان همایون روند
تحر[*یر]راً فی التارخ (یخ) ۲۹ شہر ربیع الاول سنہ ۱۰۶۷

پروانگی حضور خورشید ظہور اشرف اقدس [ *समाप्त* ]
همایون اعلی¹

[ सारांश* ]

२ रा अली आदिलशाह → हनुमंतगौडा गुत्तल

| ४४ | हि. १०२५ मोहरम १५ | १५३७ माघ वद्य १ | १६१६ जानेवारी २४ |
| ४५ | हि. १०२६ जखर १५ | १५३९ ज्येष्ठ वद्य २ | १६१७ जून १० |
| ४६ | हि. १०२७ जखर २५ | १५४० ज्येष्ठ वद्य १२ | १६१८ जून ९ |
| ४७ | हि. १०२७ शाबान ३ | १५४० श्रावण शुद्ध ५ | १६१८ जुलै १६ |
| ४८ | हि. १०२७ जिल्काद १० | १५४० कार्तिक शुद्ध ११ | १६१८ आक्टोबर १९ |
| ४९ | हि. १०२८ शव्वाल २३ | १५४१ भाद्रपद वद्य ११ | इ. १६१९ सप्टेंबर २३ |
| ५० | हि. १०२९ मोहरम २६ | १५४१ मार्गशीर्ष वद्य १३ | १६१९ डिसेंबर २३ |
| ५१ | हि. १०२९ जवल ९ | १५४२ चैत्र शुद्ध १० | १६२० एप्रिल २ |
| ५२ | हि. १०२९ जिल्काद १४ | १५४२ आश्विन शुद्ध १५ | १६२० आक्टोबर १ |
| ५३ | हि. १०२९ जिल्काद अखेर | १५४२ कार्तिक शुद्ध २ | १६२० आक्टोबर १७ |
| ५४ | हि. १०२९ जिल्हेज २५ | १५४२ कार्तिक वद्य १२ | १६२० नोव्हेंबर ११ |
| ५५ | हि. १०२९ जिल्हेज २९ | १५४२ मार्गशीर्ष शुद्ध १ | १६२० नोव्हेंबर १५ |
| ५६ | हि. १०३० रवल २६ | १५४२ माघ वद्य १२ | १६२१ फेब्रुवारी ८ |
| ५७ | हि. १०३३ रमजान १३ | १५४६ आषाढ शुद्ध १४ | १६२४ जून १८ |
| ५८ | हि. १०३४ सफर २३ | १५४६ मार्गशीर्ष वद्य १० | १६२४ नोव्हेंबर २५ |
| ५९ | हि. १०३४ रवल ५ | १५४६ पौष शुद्ध ७ | १६२४ डिसेंबर ६ |
| ६० | हि. १०३४ जखर १ | १५४७ अधिकचैत्र शुद्ध ३ | १६२५ मार्च १ |
| ६१ | हि. १०३५ रखर १४ | १५४७ पौष वद्य १ | १६२६ जानेवारी ३ |
| ६२ | हि. १०३५ जवल ५ | १५४७ माघ शुद्ध ६ | १६२६ जानेवारी २३ |
| ६३ | हि. १०३५ जखर १३ | १५४७ फाल्गुन शुद्ध १५ | १६२६ मार्च २ |
| ६४ | सु. १०२६ | १५४७–४८ | १६२५–२६ |
| ६५ | हि. १०३५ शव्वाल ९ | १५४८ आषाढ शुद्ध १० | १६२६ जून २४ |
| ३ | हि. १०३५ जिल्हेज १८ | १५४८ भाद्रपद वद्य ५ | १६२६ आगष्ट ३१ |
| ६६ | हि. १०३५ जिल्हेज २० | १५४८ भाद्रपद वद्य ७ | १६२६ सप्टेंबर २ |
| ६७ | हि. १०३६ रवल १७ | १५४८ मार्गशीर्ष वद्य ३ | १६२६ नोव्हेंबर २६ |
| ४ | हि. १०४० रखर २४ | १५५२ कार्तिक वद्य १० | १६३० नोव्हेंबर १९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६८ | हि. १०४१ रवल १५ | १५५३ आश्विन वद्य २ | १६३१ आक्टोबर २ |
| ६९ | हि. १०४२ मोहरम १५ | १५५४ श्रावण वद्य २ | १६३२ जुलै २३ |
| ७० | हि. १०४७ रजब | १५५९ मार्गशीर्ष | १६३७ नोव्हें–डिसेंबर |
| ७१ | हि. १०४८ जखर १५ | १५६० आश्विन वद्य १ | १६३८ आक्टोबर १२ |
| ५ | हि. १०४८ शाबान ३ | १५६० मार्गशीर्ष शुद्ध ४ | १६३८ नोव्हेंबर २९ |
| ७२ | हि. १०४९ शाबान ११ | १५६१ मार्गशीर्ष शुद्ध १२ | १६३९ नोव्हेंबर २७ |
| ७३ | हि. १०५० रवल १२ | १५६२ आषाढ शुद्ध १४ | १६४० जून २२ |
| ७४ | हि. १०५१ जवल १७ | १५६३ श्रावण वद्य ५ | १६४१ आगष्ट १५ |
| ६ | हि. १०५१ शव्वाल ४ | १५६३ पौष शुद्ध ६ | १६४१ डिसेंबर २७ |
| ७ | हि. १०५३ जिल्हेज ९ | १५६५ फाल्गुन शुद्ध १५ | १६४४ फेब्रुवारी ८ |
| ८ | हि. १०५४ शव्वाल १० | १५६६ मार्गशीर्ष शुद्ध ११ | १६४४ नोव्हेंबर ३० |
| ९ | हि. १०५५ जखर १६ | १५६७ श्रावण वद्य २ | १६४५ जुलै ३० |
| १० | हि. १०५८ जिल्हेज २२ | १५७० पौष वद्य ८ | १६४८ डिसेंबर २७ |
| ११ | हि. १०५९ मोहरम २० | १५७० माघ वद्य ६ | १६४९ जानेवारी, २४ |
| १२ | हि. १०५९ सफर २७ | १५७० फाल्गुन वद्य १४ | १६४९ मार्च २ |
| १३ | हि. १०५९ जवल २ | १५७१ ज्येष्ठ शुद्ध ४ | १६४९ मे ५ |
| १४ | हि. १०५९ शाबान १३ | १५७१ श्रावण शुद्ध १५ | १६४९ आगष्ट १२ |
| १५ | हि. १०६२ सफर २६ | १५७३ माघ वद्य १३ | १६५२ जानेवारी २८ |
| १६ | हि. १०६५ रवल ४ | १५७६ पौष शुद्ध ६ | १६५५ जानेवारी ३ |
| ७५ | हि. १०६५ रवल १२ | १५७६ पौष शुद्ध १४ | १६५५ जानेवारी ११ |
| ९० | हि. १०६६ रवल २७ | १५७७ पौष वद्य १४ | १६५६ जानेवारी १५ |
| १७ | [हि. १०६७ मोहरंम २६] | [१५७८ कार्तिक वद्य १३] | [१६५६ नोव्हेंबर १४] |
| ७६ | हि. १०६७ सफर १५ | १५७८ मार्गशीर्ष वद्य १ | १६५६ नोव्हेंबर २२ |
| १८ | हि. १०६७ रवल २९ | १५७८ माघ शुद्ध १ | १६५७ जानेवारी ५ |
| ७७ | हि. १०६७ रखर १९ | १५७८ माघ वद्य ६ | १६५७ जानेवारी २५ |
| १९ | हि. १०६७ रखर १९ | १५७८ माघ वद्य ६ | १६५७ जानेवारी २५ |
| ७८ | हि. १०६८ रखर १ | १५७९ पौष शुद्ध ३ | १६५७ डिसेंबर २७ |
| ७९ | हि. १०६८ जवल १९ | १५७९ माघ वद्य ५ | १६५८ फेब्रुआरी १२ |
| ८० | हि. १०६९ रखर १९ | १५८० पौष वद्य ५ | १६५९ जानेवारी ३ |
| २० | सु. १०६० | १५८१–८२ | १६५९–६०. |
| २१ | हि. १०७१ शब्वाल ५ | १५८३ ज्येष्ट शुद्ध ६ | १६६१ मे २४ |
| ८१ | हि. १०७१ जिल्काद १७ | १५८३ आषाढ वद्य ४ | १६६१ जुलै ५ |
| ९१ | हि. १०७२सफर ? | १५८३ आश्विन ? | १६६१ सप्टें–आक्टोबर ? |
| ९२ | हि. १०७२ जवल ७ | १५८३ पौष शुद्ध १० | १६६१ डिसेंबर २० |
| २२ | हि. १०७४ रमजान ८ | १५८६ चैत्र शुद्ध ११ | १६६४ मार्च २७ |
| २३ | हि. १०७५ रजब ४ | १५८६ माघ शुद्ध ५ | १६६५ जानेवारी ११ |
| ८२ | हि. १०७६ रखर २५ | १५८७ आश्विन वद्य १२ | १६६५ आक्टोबर २५ |
| २४ | हि. १०७८ जवल २२ | १५८९ कार्तिक वद्य ८ | १६६७ आक्टोबर ३० |
| २५ | हि. १०८१ शाबान ७ | १५९२ पौष शुद्ध ९ | १६७० डिसेंबर १० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८३ | हि. १०८४ मोहरम १६ | १५९५ वैशाख वद्य ३ | १६७३ मार्च २५ |
| ८४ | हि. १०८४ रजब १४ | १५९५ आश्विन शुद्ध १५ | १६७३ आक्टोबर १५ |
| २६ | हि. १०८६ रबल ९ | १५९७ वैशाख शुद्ध ११ | १६७५ मे २५ |
| २७ | हि. १०८६ रबल ९ | १५९७ ज्येष्ठ शुद्ध ११ | १६७५ मे २५ |
| २८ | हि. १०८६ रबल ११ | १५९७ ज्येष्ठ शुद्ध १४ | १६७५ मे २७ |
| २९ | जु. (आ.) १९ शाबान २४ | १५९८ आश्विन वद्य १० | १६७६ आक्टोबर २२ |
| ८५ | हि. १०९१ शव्वाल ४ | १६०२ कार्तिक शुद्ध ६ | १६८० आक्टोबर १८ |
| ३० | हि. १०९१ जिल्हेज २५ | १६०२ पौष वद्य १२ | १६८१ जानेवारी ६ |
| ८६ | हि. १०९५ जिल्हेज २४ | १६०६ कार्तिक वद्य १० | १६८४ नोव्हेंबर २२ |
| ८७ | हि. १०९६ सफर ५ | १६०६ पौष शुद्ध ६ | १६८५ जानेवारी १ |
| ८८ | हि. १०९६ रबल ३ | १६०६ माघ शुद्ध ५ | १६८५ जानेवारी २९ |
| ३१ | जु.(आ.) ३२ जवल ४ | १६१० फाल्गुन शुद्ध ६ | १६८९ फेब्रुवारी १५ |
| ८९ | जु. (आ.) ३३ जखर ४ | १६१२ चैत्र शुद्ध ६ | १६९० मार्च ६ |
| ९३ | जु. (आ.) ४० रमजान १ | १६१८ चैत्र शुद्ध ३ | १६९६ मार्च २५ |
| ३२ | जु.(आ.) ४२ शाबान १८ | १६२० माघ वद्य ५ | १६९९ फेब्रुवारी ९ |
| ३३ | जु. १ जखर ४ | १६२९ भाद्रपद शुद्ध ५ | १७०७ आगस्ट २१ |
| ९४ | ... रखर १९ | १६३० आषाढ वद्य ५ | १७०८ जून २७ |
| ९५ | जु (?) १ मोहरम १ | ? | ? |

# पत्रांवरील टीपा

## १-२

हीं पत्रें कालदृष्ट्या फार जुनीं आहेत म्हणून प्रसिद्ध केलीं आहेत.

## ३

या पत्रांतलि केंग नायक पूर्वपरिचित आहे. मुहम्मद्‌नामा, शिवतत्त्वरत्नाकर, ताम्रपटशिलालेख इत्यादींतून याचे उल्लेख आले आहेत;[१] पण मुसलमानी साधनांत हें नांव कुलवाचक म्हणून आलेलें आढळतें. त्यावरून केंग नायकाच्या कुळांतील विशिष्ट व्यक्ति निश्चित करतां येत नाहींत. केंग नायकानें कोणती हरामखोरी केली तें या फर्मानावरून समजत नाहीं.

## १०

या फर्मानांत राणे बेन्नूर कर्यात मुकासा दिल्याचें नमूद आहे; पण कोणाला तें सांगितलेलें नाहीं. सनदापत्रें पृ. १०४ वर 'शहाजीनें राणे बेन्नूर परगण्याच्या अधिकाऱ्यांना लिहिलेलें खुर्दखत आहे. त्याचा काल श. १५७१ आश्विन शुद्ध १२, इ. १६४९ ऑक्टोबर ७ हा असून त्यांत यावेळीं राणे बेन्नूर परगणा शहाजीस मोकासा म्हणून मिळाल्याचें नमूद आहे. येथें शहाजीलाच ही कर्यात दिली असेल काय? शहाजी श. १५७० च्या श्रावणांत अटकेंत पडला आणि हें फर्मान त्याच वर्षाच्या पौषांतलें आहे. यामुळें वरील शंका दृढ होऊं शकत नाहीं.

## १२

याच अर्थाचें पण अडीच महिन्यांनीं याचे अगोदर सुटलेलें फर्मान आहे[२]. दरम्यानच्या या अवधींत हणमंत गौडा स्वारीवर कां गेला नाहीं तें समजत नाहीं. कां पूर्वीच्या दिरंगाईनें कामें करण्याच्या पद्धतीचा हा नमुना आहे.

## १५

खानगौडा श. १५६६ वैशाख वद्य ७ व श. १५७१ कार्तिक वद्य १३ यांचे दरम्यान केव्हां तरी मेला.[३] पण तदनंतर इब्राहीम मूसाखान याची खास नेमणूक करण्याइतकी केंचन गौडानें कोणती बंडखोरी केली तें समजण्यास मार्ग नाहीं.

---

१ शिवाजी निबंधावली भाग २ पृ. ७३; सोर्सेस ऑफ् विजयनगर हिस्ट्री पृ. ३५४ व पुढें; भा. इ. सं. मं. त्रैमासिक १८।२, द. म. इ. सा. खं. ३।४६.
२ ऐफासा खंड २।१४ ३ शिचसा खंड ६।६३, ६४.

१६

चित्रकल म्हणजे म्हैसूर संस्थानांतील चित्रदुर्ग असेल काय ? तेथील नायकाच्या बंडखोरीचें स्वरूप अजून अज्ञात आहे.

१७

हें फर्मान अर्धवटच मिळालें. यांतील तारीख, मेलेला व ज्याला हें पाठविलें तो अशा दोघांचीं नांवें, इत्यादि तपशील नाहींसा झाला आहे; पण याचें सामान्यतः सार असें दिसतें कीं, मुहम्मद आदिलशाहाच्या कारकिर्दींत कोणी कर्ता हनुमंत गौडा मुहम्मदनगर (कर्नूल) मामलयामध्यें मरण पावला असतां त्याच्या मुलाचें सांत्वन करणें व त्यास स्फूर्ति देणें यांसाठीं हें फर्मान पाठविलें.

१८

ऐतिहासिक फार्सी साहित्याच्या पहिल्या खंडांत खानापूरचे घोरपड्यांकडील एक फर्मान छापलें आहे. त्यांत रौलोजी घोरपडे यानें दुसऱ्या अली आदिलशाहास 'आपण जुने चाकर असूनही बेरोजगार आहों व आपणास कुठलाही मोकासा वगैरे नाहीं.' अशी विनंति केल्यावरून त्यास बादशाहानें खान मुहम्मदाचा मुलगा व कर्नाटकाचा सुभेदार मुहम्मद इख्लासखान याजकडे जाऊन पादशाही मसलतींत म्हणजे स्वारींत सामील व्हावें असें आज्ञापिलें आहे[1]. या फर्मानाची तारीख-हि. १०६७ सफर २४ ही आहे[2]. मुहम्मद आदिलशाह हि. १०६७ मोहरम २६ रोजीं[3] वारला व २ रा अली आदिलशाह गादीवर आला. अर्थात् हें फर्मान तो गादीवर आल्यानंतर एक महिन्याच्या आंतच सोडलें आहे. या फर्मानावरून मुहम्मद इख्लासखानानें या पूर्वीच पादशाही मसलत सुरू केल्याचें कळतें. म्हणजे इकडे बादशाह गादीवर बसतो न बसतो तोंच दुसरीकडे पादशाही स्वारी सुरू झाली होती. अर्थात् या स्वारीचें महत्त्व व जरूरीही तशीच असली पाहिजे हें उघड आहे; मात्र या फर्मानावरून स्वारी कोणावर झाली व तिचें क्षेत्र कोठें होतें याची नीट कल्पना येत नाहीं. फार तर येवढें म्हणतां येईल कीं, रौलोजीस कर्नाटकच्या सुभेदारास मिळण्याविषयीं फर्माविलें आहे त्या अर्थीं या स्वारीचें क्षेत्र कर्नाटकांत कोठें तरी होतें. पण प्रस्तुत लेखांक आणि लेखांक ७६ यांमुळें या स्वारीवर आणखी प्रकाश पडत आहे. पैकीं ७६ वा लेखांक हि.१०६७ सफर १५ या तारखेचा[4] आणि फार्सी व मराठी अशा दोन भाषांतील असून त्यांत गदग परगण्याचा देसाई वेंकटाद्रि नागोजी यास खान मुहम्मदचा मुलगा मुहम्मद इख्लासखान या 'बराबरी वजिरासी देउनू कर्नाटकचे सुभेदारी सरफ-

---

१ ले. ६०. २ श. १५७८ मार्गशीर्ष वद्य १०; इ. १६५६ डिसेंबर १. ३ श. १५७८ कार्तिक वद्य १३; इ. १६५६ नोव्हेंबर ४. ४ श. १५७८ मार्गशीर्ष वद्य १; इ. १६५६ नोव्हेंबर २२,

राज करून सीव्या बदअख्तासी दफे करीव्याबदल पाठविले असे तरी तुवा अपुले हशम जमायेतसहीत खान मशारनुलेपासी जाउनू त्याचे रजातलबी असोन मसलद करून अपुले खिजमत जाहीर करणे' असा हुकूम केला आहे. फार्सी मजकुरांतही वरील आशयाचेच शब्द आहेत. खानापूर व गदग अशा दोन्ही फर्मानांत आलेला मुहम्मद इख्लासखान एकच आहे व तारखाही अगदीं जवळच्या असल्यानें इख्लासखानाची स्वारी शिवाजीवरच होती हें निश्चित ठरतें आणि शिवाजी अथवा त्याचे लोक कर्नाटकांत कोठें तरी गडबड करीत होते येवढें अनुमान होतें. निश्चित प्रदेशाचा मागमूस मात्र यावरूनही लागत नाहीं. तो उलगडा प्रस्तुत फर्मानावरून कांहींसा करतां येतो. हे फर्मान हि. १०६७ रवल २९ या तारखेचें[1] व २ ऱ्या अली आदिलशाहानें गुत्तलच्या हनुमंत गोंडास धाडलेलें आहे. यांत प्रस्तुत गोंडास लिंगदहळ्ळि व कोथीहाळ हीं गांवें इनाम दिल्याचें नमूद आहे; पण बक्षिसाचें कारण सांगतांना 'हरामखोर सीवा यानें निष्ठेतून पाय बाहेर टाकून व पादशाही विलायतींत ढवळाढवळ करून पाय पसरले होते. तेव्हां त्या हरामखोरास दफे करण्यासाठीं खान मुहम्मदचा मुलगा मुहम्मद इख्लासखान यास कर्नाटकची सुभेदारी देऊन उत्तम वजीरांसह पाठविलें होतें. त्या प्रसंगांत तुम्ही ( हनुमंत गोंडा ) त्याच्या ( मु. इ. ) समक्ष मासूर तर्फेत आपल्या लोकांसह सीवाच्या लोकांशीं खूप लढाई दिली व त्यांचा मोड केला' अशी हकीकत नमूद केली आहे. यांतही वरील दोन फर्मानांत आलेला मुहम्मद इख्लासखान उल्लिखित आहे, हरामखोर सीवा पण आहे आणि फर्मानाची तारीखही पहिल्या दोन फर्मानानंतर अडीच सवा दोन महिन्यांनीं आहे. तेव्हां हेंही वरील स्वारीलाच उद्देशून असलें पाहिजे. मासूर हें गांव म्हैसूर संस्थानच्या शिमोगा जिल्ह्यापैकीं शिकारपूर तालुका व धारवाड जिल्ह्यापैकीं हिरे केरूर अथवा कोड तालुका यांच्या सरहद्दीवर असून धारवाड गॅझिटियरमध्यें त्याजविषयीं थोडी माहिती आहे. अगडीच्या या फर्मानामुळें येवढें निश्चित होतें कीं, शिवाजीचे लोक धारवाड जिल्ह्याच्या अगदीं दक्षिण टोकापर्यंत गेले होते; पण तेथें म्हणजे मासूरच्या आसपास त्यांचा पराजय झाला. तसेंच ही स्वारी नेमकी केव्हां सुरू झाली तें समजत नसलें तरी मुहम्मद आदिलशाह आसन्नमरण असतां ही चालू होती व त्याच्या मरणानंतर दोन महिन्यांनीं तिजमधील एक भाग संपला असें दिसतें. या वेळीं स्वतः शिवाजी व त्याचे लोक आणखी कोठें कोठें धुमाकूळ घालीत होते हें समजण्यास साधन नाहीं. शिवापूर शकावलींत श. १५७८ आश्विन वद्य १ आणि माघ शुद्ध ६ या दोन दिवसांचे व शिवाजीच्या हालचाली सांगणारे उल्लेख आहेत;[2] पण मधील काळाचे नाहींत.

---

१ श. १५७८ माघ शुद्ध १; इ. १६५७ जानेवारी ५. २ शिचप्र पृ. ५०, ५५.

आणि ही स्वारी नेमकी त्या काळांतच पडते. जेधे शकावलीचीही तीच गत आहे.[१] इतर शकावलींतही ही माहिती आलेली नाहीं. विशेषतः शिवभारतांत शिवाजीच्या या हालचालीचा उल्लेख नसावा हें आश्चर्य होय. अथवा आश्चर्य कसलें? ज्या कारणानें आलमगिरिनाम्यासारख्या ग्रंथांत शायिस्तेखानावर शिवाजीनें घातलेल्या छाप्याचें अथवा शिवाजीनें केलेल्या सुरतेच्या लुटीचें वृत्त गळलें, त्याच कारणानें शिवाजीच्या या स्वारीचें वर्णन शिवभारतांत व इतरत्रही गाळलें गेलें असेल. परमानंदाला वाटलें असावें कीं, आपण तर 'यशांसि शिवराजस्य श्रोतव्यानि' असें श्रोत्या ब्राह्मणांना सांगून बसलों.[२] तेव्हां आतां शिवराजाच्या अयशाचें वर्णन कसें करावें?-किंवा मुसलमानी दरबारी वाकेनिवीस बादशाहाच्या अपयशाची नोंद करणें त्याचे क्रोधाच्या भयानें टाळीत. तसेंच येथेंही झालें असेल

ही स्वारी येवढ्यावरच थांबली कीं नाहीं याविषयीं शंका येते. शिवाजीची कटकट अजिबात बंद पडली नसावी. कारण गदग देसायांकडील हि १०६८ जवल १९ चें फर्मान पुढें छापलें आहे.[३] त्यांत अफजलखानास मोठी फौज व कोठली तरी सुभेदारी देऊन पाठविल्याचें सांगून गदगच्या देसायांना त्यास आपल्या जमावासह मदत करण्यास आज्ञापिलें आहे. हें फर्मान जागजागीं फाटून मजकूर नाहींसा झाल्यामुळें अफजलखानास कुठें, कोणत्या स्वारीवर पाठविलें तें समजत नाहीं; पण बहुधा शिवाजीच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठींच त्याची योजना झाली असावी. श. १५८० व १५८१ चा आरंभ यांतही शिवाजीनें तेरदाळ परगण्यांत कांहीं गडबड उडविली होती; मात्र तींत त्यास माघार घ्यावी लागली असें दिसतें. पण तो विषय प्रस्तुत टाचणाच्या कक्षेबाहेरचा आहे. मुहम्मद आदिलशाहाचें दुखणें विकोपास जाणें व राज्याचा पुढील वारस कोण हा प्रश्न उत्पन्न होऊन तशांतच औरंगजेबाची विजापूरवर स्वारी या बाबींनीं विजापुरास जो गोंधळ उडाला त्याचा पुरेपूर फायदा घेण्याचें शिवाजीनें ठरविलें होतें असें वाटतें. यामुळें श. १५७८ मध्यें त्यानें बऱ्याच प्रकरणांना हात घातला. पैकीं चंद्रराव प्रकरणांत यश मिळालें, तर कर्नाटकांतील स्वारी कांहींशी अंगलट आली.

१९

या वेळीं विजापूरच्या राज्यांत चाकरीची (आणीबाणीची) वेळ येण्यास कारण काय झालें तें नीट समजत नाहीं. मोगलांची स्वारी होणार हें या वेळीं निश्चितपणें माहीत झालें होतें; पण ती प्रत्यक्ष सुरू झाली नव्हती आणि तिचें क्षेत्र विजापूरपासून फार दूर उत्तरेस होतें.

२०

हें धाडण्याचें कारण-बहुधा शिवाजी व अफजलखान यांचा संघर्ष असावें.

१ शिचप्र पृ. १८. २ शिभा अ. १।२३. ३ ले. ७९

## २१

गुत्तलच्या थेट पूर्वेस सुमारें दहा मैलांवर व तुंगभद्रेच्या पलीकडे होळल गांव आहे; पण येथें कोणाची सरहद्द होती तें समजत नाहीं. कदाचित् नेहमीं उठावणी करून विजापूरकरांस त्रास देणाऱ्या हरपनहळ्ळीचे नायकाच्या प्रदेशाची सरहद्द येथें विवक्षित असणें शक्य आहे.

## २२

यांत शर्झाखान तोरगळ व मलनाड यांच्या स्वारीवर नेमल्याचें सांगितलें आहे. तारीखे अलीमध्यें बादशाह ता. १ शाबान सन १०७२ मध्यें प्रस्तुतच्या स्वारीवर निघाल्याचें सांगितलें आहे.[1] तत्पूर्वी बरेच दिवस शर्झाखान मलनाडच्या स्वारीवर होता. तेव्हां तारीखे अलीच्या हिशेबानें ही स्वारी निदान हि. १०७२ च्या मध्यास सुरू झाली असली पाहिजे. पण बुसमध्यें या प्रसंगाची तारीख १०७३ शाबान १ अशी दिली आहे.[2] मला वाटतें दोन्ही तारखा चुकल्या असून खरी तारीख या फर्मानाच्या तारखेनंतर केव्हां तरी असली पाहिजे.

## २३

क्र. २२ च्या फर्मानांत हनुमंत गौडास शर्झाखानाच्या मदतीस जाण्याबद्दल हुकूम असून यांत तो पादशाही स्वारीत मरण पावल्याचें सांगितलें आहे. तेव्हां तो बहुधा मलनाडवरील स्वारीत मेला असावा.

## २४

एकविसाव्या फर्मानांत शत्रूच्या सरहद्दीचा प्रश्न आला असून त्यावरील टीपेंत मी कदाचित् हरपनहळ्ळीकरांची सरहद्द तेथें विवक्षित असावी असें सुचविलें आहे. तें या फर्मानामुळें दृढ होतें. यांत हरपनहळ्ळीचा नायक व विजापूरकर यांच्या रेटारेटीचा स्पष्ट उल्लेख आहे. एकविसाव्या लेखांतील होळल हडगलीपासून जवळच आहे.

## २५

या फर्मानांत आलेले हबीबशाह व सय्यिद् मख्दूम हे शर्झाखानाचे मुलगे असल्याची माहिती जुनीच आहे. या फर्मानांत त्यांची कोणत्या कामावर खास नेमणूक झाली होती हें स्पष्ट केलें नसल्यानें मोठीच हानी झाली आहे.

## २९

याचे शिक्यांत خان جہان بہادر ظفر جنگ کوکلتاش بندہ بادشاہ عالمگیر غازی असा मजकूर असल्यानें हा हुकूम खान जहान बहादुर याचा आहे हें उघड ठरतें. अब्दुल-करीम बहलूलखान यानें खवासखानास कैद व ठार करून सर्व अधिकार बळकाविल्यावर तो व दखनी सरदार यांमध्यें जास्त जास्त वितुष्ट येऊं लागलें. शेवटीं [ हि. १०८७ ] मोहरम १६ या तारखेस[3] दखनी

---

१ हस्तलिखित पृ. १४६. २ पृ. ३११. ३ श. १५९८ चैत्र वद्य २, इ. १६७६ मार्च २१.

सरदार सय्यिद् मख्दूम शर्झाखान व अब्दुल–करीम यांमध्यें चकमक उडाली. नंतर शर्झाखान बहादुरखानास सन्दलापूर येथें भेटला. दोघांनीं मिळून अब्दुल-करीमनें पूर्वीप्रमाणें एक सरदार म्हणून रहावें; पण बाद्शाहीचा कारभार दक्षिणी लोकांनीं पाहावा असें घडवून आणण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें बहादुरखानानें ता. २८ रबिलावल रोजीं[1] कुत्बुद्दीनखान व इस्लामखान रूमी यांस विजापूरवर चालून जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते गेले; पण अब्दुल–करीमनें अलियाबादेनजीक लढाई देऊन इस्लामखानास ठार व कुत्बुद्दीनखानास पराजित केलें. बुसमध्यें अशी माहिती आली आहे[2]. या चकमकीनंतर सुमारें पावणे चि महिन्यांनीं हा कागद् लिहिला. तेव्हां अजूनही बहादुरखानाचा विजापूरवर हल्ला करण्याचा विचार होता असें दिसतें. मोगली साधनांत यापेक्षां अधिक माहिती नाहीं. पण इस्लामखानाचे मृत्यूची तारीख मासिरे आलमगीरीच्या कलकत्ता प्रतींत ११ रबिलाखर[3] व आग्रा प्रतींत १५ रबिलावल[4] अशी दिली आहे. अब्दुल–करीमनें सिकंदर आदिलशाहास कैदेंत टाकल्याचा उल्लेख मात्र कोठेंच नाहीं.

३०

या फर्मानाचा आरंभाचा भाग नाहींसा झाल्यानें यांत कोणता नवाब उल्ले-खिला होता हें समजण्यास मार्ग नाहीं.

३१

माआममध्यें ता. ६ व १५ (आग्रा प्रत ११) जिल्हेज हि. १०९७ यांच्या दरम्यान[5] कासिमखानाची बसवापट्टण तर्फेवर आणि शेख चांदची तेथल्या किल्ले-दारीवर नेमणूक झाल्याचें सांगितलें आहे.[6] या कागदाच्या वेळीं कासिमखान आपल्याच जागीं असून शेख चांदच्या जागीं गाझी बेग आलेला दिसतो. या पत्रांतील कानडी मजकुरांत बाद्शाही सैन्यासह कूच करून बाळापूरच्या प्रदेशांत जाण्याविषयीं उल्लेख आला आहे; पण त्याचा हेतू नीट ध्यानांत येत नाहीं.

३२

पत्राच्या स्वरूपावरून मागील पत्रांतील कासिमखानच येथें उल्लिखित आहे असें वाटतें. पण माआमधील उल्लेखावरून कासिमखान औरंगजेबाच्या ४७ व्या जुलूसमध्यें जिवंत होता असें दिसतें.[7] येथें तर त्यास मरहूम म्हटलें आहे. तेव्हां हा कासिमखान भिन्न तरी असेल किंवा हा लेख व माआंतील उल्लेख यांमध्यें कांहीं गफलत असेल.

३३

यावर शिक्का किंवा तुघ्रा कांहींच नाहीं. यामुळें हा कागद कोणाकडून व केव्हां सुटला हें निश्चयानें कांहींच सांगतां येत नाहीं. मी हा शाहआलम बहादुराचा आहे असें धरून तारीख घातली आहे.

---

१ ज्येष्ठ वद्य ३०; जून २. २ पृ. ४५०–५१. ३ पृ. १५१. ४ औरंगजेबनामा २–६२. ५ श. १६०८ कार्तिक शुद्ध ८ व वद्य २; इ. १६८६ आक्टोबर १४ व २३. ६ पृ. २८३ ७ पृ. ४७०.

### ३४, ३५

हीं फर्मानें फार जुनीं आहेत येवढ्यासाठींच प्रसिद्ध केलीं आहेत.

### ३६

हें व अशाच प्रकारचीं कांहीं फर्मानें येथें प्रसिद्ध करण्याचें कारण म्हणजे तीं राज्यकारभारांतील वेतन विषयाची माहिती देतात हें होय. पगार नाण्यांत ठरविला असला तरी तो नोकर असेल तेथें किंवा महिन्याच्या महिन्यास न मिळतां एक किंवा अधिक गांवांच्या सरकारी उत्पन्नांतून अर्थात् वसुलीच्या दिवसांत मिळे असें दिसतें. विशिष्ट नोकर कोणत्या सुहूर सनांत, कोणाकडे, कामावर ठेवला, त्यास काय पगार ठरविला, कोणाची पगाराची वांटणी काढून या मनुष्यास दिली असल्यास, ती कां व कोणाकडून काढली हा तपशीलही अशा कागदांत दिलेला आढळतो.

### ३८, ३९, ४१

या तीन फर्मानांत अफरादांचे मुख्य म्हणून तीन निरनिराळे इसम निर्देशिले आहेत. तिघांचीही नेमणूक सु. १०१३ पासूनच झाली आहे. सरनौबत व सरे सरनौबत अधिकाऱ्यांप्रमाणें सरे अफराद व सर सरे अफराद असे अधिकारी असावे.

### ४६, ४७, ४९, ५१, ५२,

हीं पांच फर्मानें कारभारांतील पगार विषयाला उद्देशून आहेत. त्यांचा अर्थ सामान्यतः वर आलेल्या अनेक फर्मानांप्रमाणें आहे; पण तो सुस्पष्ट करतां येत नाहीं. म्हणून फक्त पाठच द्यावा लागला आहे.

५२ मध्यें 'दर मस्लिहत कन्दनूल रुजूअ कन्ती' असा प्रयोग आला आहे. तेव्हां कन्दनूल व कन्ती या दोन ठिकाणीं आदिलशाही स्वारी चालू होती असें दिसतें.

### ५३

हें व क्र. ५६ यांवर २ ऱ्या इब्राहीम आदिलशाहाचा पुढील मजकुराचा तुग्रा आहे. ابوالمظفر ابراهيم عادلشاه خلد ملكه قدره ابدا

### ५५

या फर्मानांत उल्लेखिलेल्या कन्दनोलच्या मसलतीची अधिक माहिती अद्याप इतरत्र कोठें उपलब्ध झालेली नाहीं. ५२ मध्यें तिचा फक्त उल्लेख आहे. कन्दनोल हें कर्नूलचें जुनें अपभ्रष्ट नांव असावें. शुद्ध व इ. स. च्या १६ व्या शतकांतील नांव कन्दनवोलु होतें असें दिसतें.[१] हफ्त कुर्सीमध्यें हि. १०३० मध्यें कर्नूल जिंकल्याचें नमूद आहे. तो या स्वारीचाच परिणाम असावा.

---

१ इन्स्क्रिपूशन्स ऑफ दि मद्रास प्रेसिडेन्सी पृ. ९६६ क्र. ५७९.

५६

२७ रबिलाखरला श. १५४२ ची माघ वद्य चतुर्दशी येते. अर्थात् येथें सौर वर्षप्रतिपदेस उद्देशूनच नौरोझ शब्द वापरला आहे. इंग्रजी तारीख ११ मार्च १६२१ ही आहे.

६३

या फर्मानांत उल्लेखिलेल्या मसलतीचा निश्चयात्मक तपशील समजण्यास साधन नाहीं. मलिकंबरनें मरणापूर्वीं थोडे दिवस विजापुरी प्रदेशावर स्वारी केली होती तिला उद्देशून हा उल्लेख असेल काय ?

६७

या फर्मानांत उल्लेखिलेल्या मसलतीचाही तपशील समजण्यास साधन नाहीं.

६९

या फर्मानाची तारीख हि. १०४२ मोहरम १५ (श. १५५४ श्रावण वद्य २, इ. १६३२ जुलै २३) आहे. यांत मीर अली रजा याजकडे असलेला गदग परगण्यांतील सर्व गांवांचा मोकासा दूर करून तो शहाजी भोसल्याचा फर्जंद संबजी यास दिला असल्याचें सांगितलें आहे. मीर अली रजा किती तरी दिवस बंकापूर मामल्याचा हवालदार होता. तो या सुमारास मेला असेल म्हणून किंवा इतर कांहीं कारणानें त्याजकडून हीं गांवें दूर झालीं असावीं. पण मुख्य मुद्दा संभाजी व त्याजबरोबर शहाजी यांसंबंधीं आहे. संभाजी या वेळीं स्वतंत्र कर्तृत्व दाखवील इतका मोठा असेल काय ? फर्मानाच्या पाठीवर दोन मोठे सूचक वाक्यखंड आहेत ते असे—'शाहाजीस मोकासा दिल्हे बा फर्मान' 'देहाये पा गदग हा (इस्तिकामत) सबजी भोसला'. यावरून उघड होतें कीं, फर्मानांत जरी संभाजीस मोकासा दिल्याचें लिहिलें आहे तरी तो वस्तुतः शहाजीसच दिलेला होता. या फर्मानाच्या मितीनंतर एका महिन्यांतच शहाजीनें निजामशाही उभारल्याचें जाहिर केलें. अर्थात् फर्मानाचे वेळीं शहाजी त्याच उद्योगांत गढून गेला असला पाहिजे. पण याच वेळीं स्वतःच्या उद्योगांत यश मिळेल कीं नाहीं, याविषयीं त्याला शंका येऊन त्यानें आदिलशाहीशीं पक्कें सूत्र बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला असावा. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून त्यानें आपल्या मुलाच्या नांवानें विजापुराशीं नातें जोडून ठेविलें.

७२

श. १५६१ च्या या फर्मानांत लश्करास धान्य व इतर जिन्नस पुरविण्याबद्दल व्यवस्था केली आहे. लश्कर कोठें चाललें होतें हें समजण्यास यांत साधन नसलें तरी बहुधा कर्नाटकावरील स्वारी येथें विवक्षित असावी.

## ७६, ७७

अनुक्रमें १८ व १९ यांच्या टीपा पहाव्या.

## ७९

अफजलखानास फौजेसह कोठें पाठविलें तें या फर्मानांत सांगितलें होतें; पण फर्मान फाटल्यामुळें तो मजकूर नाहींसा झाला आहे. इतरत्र आलेल्या माहितीचाही उपयोग होण्यासारखा नाहीं. उ. औरंगझेबानें श. १५७८।७९ च्या उत्तरार्ध-पूर्वार्धांत बेदर व कल्याणी किल्ले घेण्याचे जे यशस्वी प्रयत्न केले त्यांस विरोध करण्यासाठीं अफजलखानास पाठविलें होतें; पण या फर्मानाच्या कालाचे सुमारास तें प्रकरण संपून सुमारें सहा महिने झाले होते. तेव्हां त्याचा येथें कांहीं संबंध दिसत नाहीं.

## ८५

या फर्मानाच्या पाठीवर मस्ऊदखानाच्या मध्यस्थीनें हें सुटल्याचें सांगितलें असून त्याचे मागें अल्काबांची एक मोठी मालिका आहे. तिजसाठीं पहा मुधोळच्या घोरपडे घराण्याचा इतिहास परिशिष्ट अ. पृ. ५३. या मजकुराच्या उजव्या अंगास एक लंबवर्तुळी अस्पष्ट शिक्काही आहे.

## ८६–८८

हीं तिन्ही फर्मानें एकाच विषयाला उद्देशून असून त्यांचा कालही जवळ जवळ एकच आहे. यांत जमशीदखान व रुद्रो चिमणाजी सरदबीर यांच्या शिफारसीवरून सिकंदर आदिलशाहानें गदगचा देसाई श्रीनिवास वेंकटाद्री यास ५०० स्वारांची विजारत ( सरदारी ) दिल्याचें नमूद आहे. देसाई वास्तवीक पाहिलें तर मुख्यतः मुलकी अधिकारी. त्यास आवर्जून सरदारकी देण्याचें कारण काय याचा तपास केला पाहिजे. आम्ही म्हणतो कीं, जानेवारी १६८५ च्या शेवटीं मुअज्जमनें गदग वगैरे ठिकाणें हस्तगत केलीं.[1] अर्थात् गदगचे देसायांना एक तर मोंगलाचें अंकीत व्हावयास पाहिजे होतें किंवा आपल्या वतनावर पाणी सोडून आदिलशाहाकडेच राहावयास पाहिजे होतें. त्यानें उत्तरोकाकडे रहावें यासाठीं वरील दोन फर्मानांचें प्रयोजन दिसतें.

## ९१, ९२

श. १५८३ च्या पहिल्या मासत्रयांतच शिवाजीनें बहुतेक तळकोकण पादाक्रांत केलें; यामुळें तळकोकणच्या दक्षिणेस असलेल्या विजापुरी मुलुखास शिवाजीच्या लोकांचा कसा त्रास होऊं लागला हें या दोन फर्मानांत दिसतें. ९१ व्या फर्मानांत

१ हिस्टॉरिकल फ्रॅग्मेंट्स पृ. १८२ व टीप ६०, पृ. ११८; शि. च. सा. ६।१.

आलेला राजाचा मुतालीक मधू हा शिवाजीचा मनुष्य असला पाहिजे हें उघड आहे; पण बाबाजी शाम...पंडित सुभेदार तळकोकण हा शिवाजीकडचा असेलसें वाटत नाहीं. या वेळीं शिवाजीचा तळकोकणचा सुभेदार पिलाजी नीळकंठराव होता.[1] विशेषतः बाबाजी शाम...ला पंडित, मजलिसी, सुभेदार या उपाधि लाविल्यामुळें तो शत्रुपक्षाकडील संभवत नाहीं.

९४

औरंगझेबाचे मरणानंतर त्याचे मुलगे बहादुरशाह व कामबक्ष यांमधील वितुष्ट वाढून पहिला उत्तरेंतून दुसऱ्यावर चालून आला. कामबक्ष मागें हटत हटत जुलूस १ च्या शव्वाल महिन्याच्या अखेरीस हैदराबादेपासून २१३ मजलीवर आला होता. त्यापूर्वी जमादिलावलच्या आरंभीं तो बऱ्हाणपूरला होता.[2] आणि या पत्रावरून तर रखर १९ च्या पूर्वीच कांहीं दिवस तरी कामबक्ष हैदराबादच्या बाजूस असावा असें दिसतें. तेव्हां हें पत्र व मुन्तखब यांचा मेळ कसा घालावयाचा?

९५

या कागदावर शिक्का नाहीं व जुलूस कोणाचा हेंही निर्दिष्ट नाहीं. यामुळें या कागदाचा जास्त विचार करणें अशक्य आहे.

---

१ शिवकालीन पत्रसारसंग्रह ८५७, ८७१. २ मुन्तखबुल्लुबाब पृ. ६१९, ६१८; ईलियट डौसनच्या ७ व्या भागांत या हकीकतीचा सारांश देतांना तो मुन्तखबप्रमाणें दुसऱ्या जुलूसमध्येंच घातला आहे; पण मुन्तखबमध्यें शव्वाल महिना पहिल्या जुलूसचा सांगितला असतां तेवढा उल्लेख ईलियट डौसनमध्यें गळला. यामुळें ईंडीवर विसंबणारा मनुष्य ही हकीकत दुसऱ्या जुलूसमध्यें झाल्याचें धरील व त्याचा घोटाळा उडेल. मी वरील सर्व विचार करून या लेखांतील १९ रबिलाखर ही तारीख शाहआलम बहादुरशाहाच्या पहिल्या जुलूसमधील धरली आहे. दुसऱ्या जुलूसमधील या तारखेस कामबक्ष प्रकरणाचा निकाल लागून गेला होता.

# ६ आदिलशाही शिक्के

गेल्या सुमारें दहा वर्षांत अदमासें एक हजार आदिलशाही फर्मानें माझ्या पाहण्यांत आलीं. त्यांत कांहीं बनावटही आढळलीं. कित्येक फाटलीं होतीं व कालानिर्देश नाहींसे झाले होते. पण त्या सर्वांचें सम्यक्ज्ञान होण्यास शिक्क्यांची फार मदत झाली. इतरांनाही अशीच मदत व्हावी म्हणून मला आढळलेले आदिलशाही शिक्के पुढें देत आहे.

या शिक्क्यांचे चार प्रकार करतां येतात. (१) फर्मानाचे आरंभीं उठविलेले बादशाही शिक्के, (२) फर्मानाच्या शेवटीं उठविलेले प्रधानांचे शिक्के, (३) फर्मानांच्या शेवटीं उठविलेल्या मोहरा, (४) फर्मानांच्या पाठीवर उठविलेले निरनिराळ्या शेरेकऱ्यांचे शिक्के. पैकीं दुसऱ्या दोन प्रकारांतील शिक्के लावणें हें अतिशय जिकिरीचें आहे. तेव्हां त्यांविषयीं येथें कांहीं एक न लिहितां फक्त पहिल्या दोन प्रकारांसंबंधींच विचार करणार आहे.

बादशाही शिक्के प्रायः स्पष्ट उठलेले आढळतात. तेव्हां त्यांचें वाचन प्रयास न पडतां होऊं शकलें. पण प्रधानांचे शिक्के प्रायः स्पष्ट नसतात आणि मजकुरावर किंवा दुसऱ्या शिक्क्यांवर अंशतः उठलेले असतात. यामुळें कांहीं शिक्क्यांचें समाधानकारक वाचन २५।३० प्रती बारकाईनें अभ्यासूनही देतां आलें नाहीं; पण त्यांचा आकार, व्यास, लागला तेवढा मजकूर, काल, हा तपशील दिला असल्यानें शिक्का ओळखण्यास अडचण पडणार नाहीं.

फर्मानाच्या समासांतील मजकूर व खालचे शिक्के यांच्या संबंधाविषयीं येवढेंच म्हणतां येईल कीं, ज्याच्या माहितीनें फर्मान निघालें त्याचा शिक्का बहुधा उठविलेला आढळतो. पण कांहीं फर्मानांवर ज्याच्या माहितीनें तें सुटलें त्याचें नांव नमूद असूनही त्याचा शिक्का मात्र नाहीं. प्रधानांच्या शिक्क्यांविषयीं असें सामान्य विधान करण्यास हरकत नाहीं कीं ते बहुधा राजकीयेतर फर्मानांवर उठविले जात.

### अबुल-हसन

(१) अष्टकोन १½"

بکار ملکی شاه جهان محمد شاه

ابوالحسن بود از بندهاے دولت خواه ۱۰۶۳

अबुल-हसन हा मुहम्मद व दुसरा अली या दोन आदिलशाहांच्या कारकिर्दींत एक प्रसिद्ध व्यक्ति होती. ऐफासा ३।७५ (हि.१०६५ रबल १२) हें फर्मान याच्या माहितीनें सुटलें आहे. शेख अबुल-हसन नामक एका गृहस्थानें विजापूरच्या इतिहासावर एक ग्रंथ लिहिला आहे. तो हाच असेल काय?

हि. १०६८ रखर १ (ऐफासा ३।७८) । हि. १०७० रमजान १४ (ऐफासा १।२३)

## अली आदिल १ ला

(१) वर्तुळ सुमारें २″

لافتح الا علی لا سیف الا ذو الفقار
اسد الله الغالب علی ابن ابی طالب

हा शिक्का मला मुधोळचे राजघराणें[1] घोरपडे याजकडील आणि सातारा व विजापूर येथील म्यूझियमें यांतील फर्मानांवर[2] पहावयास सांपडला. यांचे काळ अनुक्रमें हि. ९७२।१५६४–६५, सु. ९७३।१५६४–६५ व हि. ९७४।१५६६–६७ असल्यानें हीं तीनही फर्मानें पहिल्या अली आदिलशाहाच्या कारकिर्दींत पडतात. अली आदिलशाहाचा खून झाल्यावर दुसरा इब्राहीम गादीवर बसला. पण तो लहान असल्यामुळें सर्व अधिकार किश्वरखान नांवाच्या प्रधानानें बळकाविला. त्याची सत्ता दुःसह झाल्यामुळें बादशाहासह इतरांनीं त्यास विजापुराहून पळ काढावयास लाविलें; पण बादशाही शिक्काही त्याजबरोबर गेल्यामुळें राजपत्रांवर कोणता शिक्का उठवावा असा प्रश्न पडला. तेव्हा रफीउद्दीन शिराझीनें सांगितलें कीं, اسد الله الغالب علے ابن ابے طالب हा मजकूर असलेला शिक्का खून झालेल्या बादशाहाच्या बोटावर असे. तो शिक्का फर्मानावर उठविला जाई व तो आज खजिन्यांत आहे; तोच शिक्का सुरू करावा. तेव्हां तोच शिक्का कांहीं काळ चालू राहिला; पुढें किश्वरखानाचा खून झाल्यावर त्याच्या गुलामानें त्याजवळचा शिक्का विजापुरास आणला. तेव्हां पुन्हा जुना शिक्का सुरू झाला असें बुसमध्यें सांगितलें आहे.[3] किश्वरखानानंतरचा विजापुरी प्रधान इख्लासखान यास हि.९९२ मध्यें पदच्युत केलें गेलें. अर्थात् त्यापूर्वीं केव्हां तरी वरील हकीकत घडली असली पाहिजे.

मी २ ऱ्या इब्राहीम आदिलशाहाचीं फर्मानें पाहिलीं तीं सर्व हि. ९९१ सफर २४ च्या पुढचीं असून त्यांवर केवळ नाद् अलीचा शिक्का आढळला. उपर्युक्त शिक्का असलेलें इब्राहीमचें फर्मान मी अद्याप पाहिलें नाहीं. पण मला येथें हें लक्षांत आणून द्यावयाचें आहे कीं, बुसमध्यें चर्चिलेल्या शिक्क्यांतील मजकूर उद्धृत करतांना अर्धा भाग निष्काळजीपणानें गाळला आहे.

पहिल्या अली आदिलशाहाच्या हि. ९७७ च्या फर्मानावर नाद् अलीचा शिक्का आहे हेंही येथें नमूद करतों.[4]

---

१ मुधोळच्या घोरपडे राजघराण्याचा इतिहास परिशिष्ट अ पृ. २८, २ अप्रसिद्ध. ३ फार्सी प्रत पृ. १६९. ४ ऐफासा २।१७

## अली आदिल २ रा

दुसऱ्या अली आदिलशाहाच्या अगदीं आरंभींच्या फर्मानांवर नाद् अलीचा शिक्का असून नंतर क्रमानें पुढील चार शिक्के वापरण्यांत आलेले आढळतात.

( ३ ) बहुदळी पिंपळपान ४″ × २३/४″

یا علی مدد

مہر شاہے زد ز مہر مرتضی بر مہر و ماہ
خسرو عادل علے بعد از محمد بادشاہ ۱۰۶۸

हि. १०६८ रखर १ ( ऐफासा ३।७८ ) हि. १०७० जवल २७ (ऐफासा २।११,
हि. १०६९ रखर १९ ( ऐफासा १।२३ ) हि. १०७० रजब ७ ( ऐफासा २।११ )
हि. १०७० जवल २ ( शिचसा ४।६८८ ) हि. १०७० रमजान १४ (ऐफासा १।२३ )

( ४ ) पिंपळपान १७/८ × २७/१६″

یا علے مدد

از تولاے علی زد سکہ بر خورشید و ماہ
شاہ دین پرور علے بعد از محمد پادشاہ ۱۰۶۷(؟)

हा शिक्का फक्त एका फर्मानावर आढळला.

हि. १०६८ जवल १९ ( ऐफासा ३।७९ )

( ५ ) वर्तुळ २१/२″

بر فرمان سکہ شاہے زد بتائید الہ
بندہ حیدر علے ابن محمد پادشاہ

हि. १०७१ रजब ५ ( ऐफासा १।२४ ) हि. १०७३ जवल १५ (ऐफासा २।१२)
हि. १०७१ जिल्काद् १७ (ऐफासा ३।८१) हि. १०७४ मोहरम ८ (ऐफासा १।२७)
हि. १०७१ जिल्हेज २३ (ऐफासा १।२५) हि. १०७५ रजब शेवट (ऐफासा १।२८-२९)
हि. १०७२ सफर ( ओटव ) हि. १०७६ रखर २५ ( ऐफासा ३।८२ )
हि. १०७२ जवल ७ ( ओटव ) हि. १०७८ रखर १२ ( आपटे )
हि. १०७२ रजब ५ ( ऐफासा १।२६)

( ६ ) वर्तुळ २१/२″

مرید نجف شاہ علی پادشاہ
ابن غازے سلطان محمد شاہ

हि. १०८१ सफर ३, १७, २० (आपटे) हि. १०८२ मोहरम २० ( आपटे )
हि. १०८१ शाबान ७ (ऐफासा ३।२५) हि. १०८२ रमजान १७ ( आपटे )
हि. १०८१ जिल्हेज १९ ( आपटे ) हि. १०८३ रजब २१ ( आपटे )

## आका खुस्रव

हा शिक्का मला फक्त एका फर्मानावरच आढळला. आका खुस्रव कोणत्या अधिकारावर होता हें समजत नाहीं.

( ७ ) लंबवर्तूळ १$\frac{1}{8}$″ × $\frac{7}{8}$″

بندہ درگاہ الہی محمد عادلشاہ آقا خسرو سنہ ۱۰۵۰

हि. १०६२ मोहरम १३ ( ऐफासा १।२२)

## इखलासखान

( ८ ) बहुदलमध्य वर्तूळ $\frac{7}{8}$″

बहुदलांत: اخلاصخان عادلشاہ

समासांत رساند بخلق خداے ... مند بہر دو سراے

इखलासखान ही पदवी आहे. पुढें मुहम्मद्, यूसुफ व रैहान असे तीन इखलासखान पदवी धारण करणारे येणार आहेत. याचें नांव काय होतें हें शिक्का पूर्ण न लागल्यानें समजत नाहीं. इब्राहीम आदिलशाहाच्या कारकिर्दीतील हि. १००९ रमजान १२ या तारखेपासून हि. १०३३ रमजान १३ या तारखेपर्यंतच्या मी पाहिलेल्या प्रत्येक फर्मानावर याचा शिक्का आढळला.

## खानभाई

( ९ ) वर्तूळ १″

در(؟) سلطان محمد عادلشاہ کوش داداری
بکار فلک چو مشغول شد نواب خانبہاے

हा शिक्का मला नीट लागलेला नाहीं; पण तो नवाब खानभाई याचा आहे हें निश्चित. कारण हा शिक्का असलेल्या कांहीं फर्मानांवर برسالہ کمترین بندگان درگاہ شاہنشاہی نواب خان بہاے किंवा بندہ درگاہ شاہی نواب خان بہاے असा मजकूर लिहिलेला आढळतो.

| | |
|---|---|
| हि. १०४५ शाबान १२ ( ऐफासा १।६ ) | हि. १०४६ रजब ६ (पोतदार) |
| हि. १०४५ रमजान १५, १६ ( पोतदार ) | हि. १०४६ जवल १,६,१०,२५(पो.) |
| हि. १०४६ मोहरम ७ ( " ) | हि. १०४६ रबी किंवा जुमाद (पो) ५ |
| हि. १०४६ सफर २६ ( " ) | हि. १०४६ शाबान १२ ( " ) |

## ख्वाजा कमाल

( १० ) पिंपळपान १½″ × ⅞″

العاجز باطاعة الاوامر والنواهي

اقل العباد خواجه كمال عادلشاهي

हा कोण होता तें समजत नाहीं.

हि. १०४८ जबर १५ (ऐफासा३।७१) हि. १०५० रबल १२ (ऐफासा३।७३)
हि. १०४८ शाबान २४(ऐफासा१।४४)

## गाझी साहिब झमान

( ११ ) वर्तुलमध्य द्वादशकोन १¾″

वर्तुळांत: غازے صاحب زمان بندہ محمد سلطان

समासांत:... روز جهان سنه ۱۰۶۲ كزو ا ... ن خانم جود خان ...

हा शिक्का मला फक्त एकाच फर्मानावर ( हि. १०६२ मोहरम १३ ऐफासा १।२२ ) आढळला. शिक्का धारण करणाराचें नांव नीट लागलेलें नाहीं. यामुळें त्याच्या पदवीनें त्यास उल्लेखिलें आहे.

## दियानतुल्मुल्क

( १२ ) वर्तुळ १″

از داد دیانت پادشاه فلک جناب

داد دیانت الملوک مرا فرحت خطاب

विजापूरच्या उमरावांत याचें निश्चित स्थान कोणतें हें ठाऊक नाहीं; पण ऐफासा ३।५३ व ३।५६ हीं फर्मानें अनुक्रमें अमीर जुम्ले व सरे मज्लिस हे अधिकार असणाऱ्या दियानतुल्मुलूकच्या माहितीनें सुटलीं असून ऐफासा ३।४९-६७ या सर्व कागदांवर हा शिक्का उठविलेला आहे.

## दौलतखान

हा शिक्का मला नीट लागलेला नाहीं. पण त्यांत वरील नांव आहे हें निश्चित.

( १३ ) लंबवर्तूळ १७/१६″ × १३/१६″

المتوكل على الله الملك المنان

اقل العباد نورس دولتخان

ऐ. फा. सा. सं. ३-१७

| | |
|---|---|
| हि. १०४० रवल ७ ( ओटव ) | हि. १०४३ रखर २५ ( ओटव ) |
| हि. १०४१ रवल १५ ( ऐफासा ३।६८ ) | हि. १०४४ मोहरम २६ ( पोतदार ) |

## नाद अली

( १४ ) वर्तूळ १५/१६"

ناد علیا مظهر العجائب تجده عونالک فی النوائب کل هم
و غم سینجلی بولایتک یا علی یا علی یا علی

हा एक मुसलमानी मंत्र आहे. इस्माईल व २ रा इब्राहीम यांच्या मी पाहिलेल्या झाडून साऱ्या फर्मानांवर मला हाच शिक्का आढळला. शिवाय मुहम्मद, २ रा अली व सिकन्दर यांच्या राजवटींतील अगदीं आरंभीं आरंभींच्या फर्मानांवर व १ ल्या अलीच्या कांहीं फर्मानांवर हाच शिक्का उठविलेला आढळून येतो.

## मज्लिसखान

हा मनुष्य कोणत्या अधिकारवर होता हें समजत नाहीं. याचा शिक्काही नीट लागला आहे असें म्हणतां येत नाहीं.

( १५ ) वर्तूळ १"

در سجد شاه شود امر نشانے
زیر یافتم ام خطاب مجلسخانے

हा शिक्का गदग-देसायांकडील हि. १०२७ जिल्काद १० पासून हि. १०३५ जखर १३ पर्यंतच्या प्रत्येक फर्मानावर आढळला.

## मुस्तफाखान

हा मुहम्मद आदिलशाहाच्या कारकिर्दींतील एक प्रसिद्ध मुत्सद्दी व सेनापति होता. हा हि. १०५८ जिल्काद ३ रोजीं वारला.

( १६ ) वर्तूळ १"

امین مصطفی خان    بنده محمد سلطان ١٠٣٧

| | |
|---|---|
| हि. १०४० रवल ( ओटव) | हि. १०४१ रवल १५ ( ऐफासा ३।६८ ) |
| हि. १०४३ रखर २५ ( ओटव ) | हि. १०५० जिल्हेज ६ ( ऐफासा १।८) |
| हि. १०४५ शाबान १२ ( ऐफासा१।६) | हि. १०५१ जवल ११(ऐफासा१।९,१०) |
| हि. १०४७ रजब (ऐफासा ३।७०) | हि. १०५१ जवल १७ (ऐफासा३।७४) |
| हि. १०४८ जखर १५ ( ऐफासा३।७१) | हि. १०५२ सफर ५ ( ऐफासा १।११ ) |
| हि. १०४८ शाबान ३ ( ऐफासा३।५ ) | हि. १०५२ जवल १७ ( ऐफासा१।१२) |
| हि. १०४८ शाबान २४ (ऐफासा१।१४) | हि. १०५५ रखर १५ (ऐफासा १।१४, १५ ) |
| हि. १०५० रवल १२ ( ऐफासा३।७३) | |
| हि. १०५० जिल्हेज ५ ( ऐफासा१।७) | हि. १०५५ रखर १६ ( ऐफासा१।६९ ) |

( १७ ) अष्टकोन १·१″

سکہ خادم درگاہ مصطفی خان

بندہ محمد ابراھیم سلطان

या शिक्क्याची प्रतिकृति सध्या मजपाशीं नाहीं. यामुळें याची पुन्हा तपासणी करतां आली नाहीं.

हि. १०४७ रजब १७ (मिरज दर्गा ) हि. १०५२ रजब १४ ।

( १८ ) अष्टकोन $1\frac{1}{16}$″

خطاب بلند ... خانم امین مصطفی خان

دادار رحیمی محمد سلطان

हा शिक्का फक्त एकाच हिजरी १०६२ मोहरम १३ या तारखेच्या फर्मानांत पहावयास मिळाला. यामुळें वाचन समाधानकारक करतां आलें नाहीं.

## मुहम्मद आदिल

( १९ ) वर्तुळ २″ व $2\frac{3}{16}$″

شاهنشہ دین محمد ابراهیم

در زیر نگین شاه شد هفت اقلیم

याच्या मध्यें ' नाद अली ' चा मंत्र; त्या भोंवतीं वर दिलेला मजकूर व त्या भोंवतीं किरणमय दुहेरी कडें असतें.

हा एकच शिक्का दोन आकारांत उठविलेला सांपडतो. लहान आकाराचा हि. १०५० जिल्हेज ५ ( ऐफासा ११७ ) पासूनच्या पुढील फर्मानांवर आढळतो. तत्पूर्वीं नादअलीचा शिक्का उठवीत. हि. १०५९ सफर २७ ( ऐफासा ३।१२ ) नंतर मोठ्या आकाराचा शिक्का उठवूं लागले.

## मुहम्मद इख्लासखान

( २० ) बहुदळी पिंपळपान $1\frac{1}{2}$″ × $1\frac{1}{2}$″ आणि $1\frac{3}{4}$″ × $2\frac{3}{16}$″

هو القادر

خانہزاد علی عادلشاہ محمد اخلاصخان

हा २ न्या अलीचा अगदीं आरंभीचा प्रधान खान मुहम्मद याचा मुलगा होता. यासच शिवाजीनें कर्नाटकांत केलेल्या पहिल्या स्वारीचा प्रतिकार करण्यास पाठविलें होतें ( पहा हेंच पुस्तक पृ. ११६ टीप १८ )

हि. १०६८ रबर १ ( ऐफासा ३।७८ ) हि. १०७० रमजान १४ ( ऐफासा ११३१ )

## यूसुफ इख्लासखान

( २१ ) वर्तूळ १″

یوسف اخلاصخان بندهٔ محمد سلطان

हा कोण होता तें ठाऊक नाहीं; पण याचा शिक्का मात्र अनेक फर्मानां-वर आढळला.

| | |
|---|---|
| हि. १०४५ रमजान १५ ( पोतदार ) | हि. १०४६ जवल १ ( पोतदार ) |
| हि. १०४५ रमजान १६ " | हि. १०४६ जवल ४ " |
| हि. १०४६ मोहरम ७ " | हि. १०४६ जवल २५ " |
| हि. १०४६ सफर २४ " | हि. १०४६ शाबान १२ " |
| हि. १०४६ रखर ६ " | |

## रैहान

( २२ ) एकादशकोन १७/१६″

ز دادار سلطان محمد خسرو دنیا و دین

نقش مهر ریحان اخلاصخان عز چنین

इख्लासखान पदवी धारण करणाऱ्या रैहानचा हा शिक्का आहे.

| | |
|---|---|
| हि. १०४७ रजब ( ऐफासा ३।७० ) | हि. १०५२ सफर ५ ( ऐफासा१।११ ) |
| हि. १०५० जिल्हेज ५ ( ऐफासा१।७ ) | हि. १०५२ जवल १७(ऐफासा१।१२) |
| हि. १०५० जिल्हेज ६ ( ऐफासा१।८ ) | हि. १०५५ रखर १५ (ऐफासा१।१४, १५) |
| हि. १०५१ जवल११(ऐफासा१।९,१०) | |
| हि. १०५१ जवल १७ (ऐफासा३।७४) | हि. १०५५ रखर १६ ( ऐफासा१।६९ ) |

## शाहनवाझखान

शाहनवाझखान ही पद्वी आहे. याचें नांव काय होतें हें समजत नाहीं. २ऱ्या इब्राहीमच्या कारकिर्दीत एक प्रसिद्ध शाहनवाझखान होऊन गेला. तोच हा असेल कीं नाहीं तें सांगतां येत नाहीं. २ ऱ्या इब्राहीमचीं कित्येक फर्मानें शाहनवाझखानाच्या माहितीनें निघालीं आहेत. हा व शिक्केकरी एक कीं दोन हेंही सांगतां येत नाहीं

( २३ ) वर्तुलमध्य वर्तूळ १५/१६″

समासांत: در سایهٔ پادشاه عادل مشهور جهان چو آفتابم

१००५

वर्तुळामध्यें: از دولتش فلک جنابم شاه نواز خان شد خطابم

हि. १००९ रमजान १२ (ऐफासा ३।३४)
हि. १०११ रमजान ४ (ऐफासा ३।३५)
हि. १०१३ जिल्हेज ५ (ऐफासा ३।३६)
हि. १०१८ रमजान २६ ( ओटव )
हि. १०२० जिल्काद १६ (ऐफासा ३।३७)
हि. १०३४ रवल ५ ( ऐफासा ३।५९ )
हि. १०३४ जखर १ ( ऐफासा ३।६० )
हि. १०३५ रखर १४ ( ऐफासा ३।६१ )
हि. १०३५ जवल ५ ( ऐफासा ३।६२)
हि. १०३५ जखर १३ (ऐफासा ३।६३)
हि. १०४८ जखर १५ (ऐफासा ३।७१)
हि. १०४८ शाबान २४ (ऐफासा ११४४)

( २४ ) शाहनवाझखानाचा आणखी एक वाटोळा $\frac{१५}{१६}$ इंच व्यासाचा शिक्का उपलब्ध आहे. तो अजून चांगला लागला नाहीं. पण त्यांत جہان شد نواب ...شد نوازخان... ابن خطا فتح خطاب باز داد इत्यादि मजकूर आहे.

हि. १०२२ रजब ५ ( ऐफासा ३।३८ )
हि. १०२३ रवल ७ ( ऐफासा ३।३९ )
हि. १०२३ रवल २५ ( ऐफासा ३।४० )
हि. १०२४ रखर २२ (ऐफासा ३।४१)
हि. १०२४ जवल २४ (ऐफासा ३।४२ )
हि. १०२४ जखर ७ (ऐफासा ३।४३ )
हि. १०२५ मोहरम १५ (ऐफासा ३।४४)
हि. १०२६ जखर १५ ( ऐफासा ३।४५ )
हि. १०२७ जखर २५ ( ऐफासा ३।४६ )
हि. १०२७ शाबान ३ ( ऐफासा ३।४७ )
हि. १०२७ जिल्काद १० (ऐफासा ३।४८)

## सिकंदर आदिल

( २५ ) वर्तूळ १$\frac{५}{८}$″

سلطان سکندر قادرے ابن عادلشاہ علے

याच्या कारकिर्दीच्या अगदीं आरंभीं नाद अलीचा शिक्का फर्मानांवर सांपडतो. नंतर हा शिक्का उठवूं लागले. याचा प्रथम प्रयोग हि. १०८९ साबान २८ या तारखेच्या फर्मानावर केलेला दिसतो ( पहा मुधोळच्या घोरपडे घराण्याचा इतिहास परिशिष्ट पृ. १२६ ). याचा आणखी एक शिक्का आहे तो असा—

( २६ ) चौकोन १″ × $\frac{१३}{१६}$″

مدد یا محی الدین

याचा पहिला उपयोग मला हि. १०९५ जवल १९ या तारखेच्या फर्मानावर आढळला.

# सूची